cmyk

## संपादकीय

### मानवाच्या तांत्रीक मर्यादा उघड !

शुक्रवारी मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि जगातील कोट्यावधी संगणक, लॅपटॉपच्या स्क्रीनवर 'ब्लू स्क्रीन ऑफ डेथ'चा मॅसेज अवतरला. या मॅसेजने जगभरातील 'मायक्रोसॉफ्ट-३६५'ची सेवा ठप्प करून टाकली. या तंत्रकल्लोळाने मायक्रोसॉफ्टवर सायबर हल्ला झाल्याची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. मात्र, सुदैवाने हा सायबर हल्ला नव्हता तर 'क्राऊडस्ट्राईक'ने केलेले एक सुरक्षाविषयक अपडेट या तंत्रकल्लोळास कारणीभूत ठरले. 'क्राऊडस्ट्राईक' ही सायबर सेक्युरिटी कंपनी आहे जी मायक्रोसॉफ्ट कंपनीला सायबर सुरक्षा पुरविण्याचे काम करते. मात्र, सुरक्षा पुरवितानाच चूक घडल्याने जगभर हा तंत्रकल्लोळ निर्माण झाला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-९२ मंगळवार दि.२३ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये


### संसद, लाल किल्ल्यावर बॉम्ब हल्ल्याच्या धमकीचा केरळच्या खासदाराला कॉल

नवी दिल्लीः संसद आणि लाल किल्ल्यावर बॉम्ब हल्ला करणार असल्याच्या धमकीचा कॉल केरळच्या सीपीआय (एम) पक्षाचे राज्यसभा खासदार व्ही. शिवदासन यांना आला. यासंबंधी त्यांनी राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांना पत्र लिहून कळवले. सिख्स फॉर जस्टिस या संघटनेकडून गुरपतवंत सिंह पन्नूच्या नावाने हा कॉल आल्याचे खासदारांनी सांगितले. राज्यसभा सभापतींनी लिहीलेल्या पत्रात खासदार शिवदासन यांनी म्हटले आहे की, मला २१ जुलै २०२४ रोजी रात्री साडेअकरा वाजता एका अनोळखी नंबरवरून धमकी देणारा कॉल आला. दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या लाउंजमध्ये खासदार ए. रहीम यांच्यासमवेत असताना कॉल आल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

# मान्सूनच्या फटक्याने कृषी क्षेत्राची पिछेहाट

## सहा वर्षांतील निचांकी कामगिरी समोर, आर्थिक पाहणी अहवालातून झाले स्पष्ट

**पुणे । प्रतिनिधी**

**मान्सूनचा फटका बसल्याने यंदा कृषी क्षेत्राची कामगिरी ढासाळली आहे. देशातील ४२.३ टक्के जनतेला उपजीविका देणाऱ्या आणि देशाच्या जीडीपीमध्ये १८.२ टक्के वाटा असणाऱ्या कृषी क्षेत्राची यंदा जबर पिछेहाट झाल्याचे वास्तव आर्थिक पाहणी अहवालात अधोरेखित झाले आहे. २०२३-२४ मध्ये देशाचा कृषी विकास दर १.४ टक्के राहणार असल्याचा अंदाज अहवालात वर्तविण्यात आला आहे. गेल्या सहा वर्षांतील ही निचांकी कामगिरी आहे.**

२०२२-२३ मध्ये कृषी विकास दर ४.७ टक्के होता. गेल्या पाच वर्षांत कृषी क्षेत्राची सरासरी वार्षिक ४.१८ टक्के दराने



वाढ झाली. परंतु २०२३-२४ मध्ये मात्र कृषी क्षेत्राची कामगिरी घसरली. एल-निनोचा फटका बसल्यामुळे मान्सूनला झालेला उशीर आणि पावसाचे कमी प्रमाण यामुळे अन्नधान्य उत्पादनात मोठी घट झाली. त्यामुळे ही स्थिती उद्भवल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### पिछेहाट असतानाही सरकारची पाट थोपटली

पिके आणि पशुधन यांची उत्पादकता वाढवण्यासाठी केंद्र सरकार विविध प्रयत्न करत आहे; शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने केलेल्या शिफारशींशी सुसंगत उपाययोजना सरकारकडून केल्या जात आहेत, असे गौरवोद्गार अहवालात काढले आहेत. दीडपट हमीभाव आणि पीएम किसान सन्मान निधीचा आवर्जून उल्लेख करण्यात आला आहे. गेल्या वर्षीच्या अहवालातही सरकारच्या प्रयत्नांमुळे कृषी क्षेत्रात वाढीचे आणि उत्साहाचे वारे वाहत आहे, अशा शब्दांत सरकारची पाठ थोपटण्यात आली होती.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी (दि. २२) लोकसभेत २०२३-२४ वर्षासाठीचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल मांडला. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांच्या देखरेखीखाली आर्थिक व्यवहार विभागाने हा अहवाल तयार केला आहे.

तृणधान्यांसारख्या पारंपरिक पिकांच्या तुलनेत पशुसंवर्धन आणि मत्स्योत्पादन या क्षेत्रांची कामगिरी खूपच चांगली राहिल्याचे अहवालात म्हटले आहे. शेती उत्पादनाच्या बाबतीत भारत हा जगातील एक प्रमुख

### कृषी क्षेत्रात गुंतवणूकिचे प्रमाण अत्यंत कमी

कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढत असली तरी ती अपेक्षेपेक्षा खूपच कमी असल्याचे आर्थिक पाहणी अहवालात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालात कृषी क्षेत्रातील गुंतवणूक वाढीचा दर वार्षिक १२.५ टक्के असायला हवा, असे म्हटले होते. परंतु प्रत्यक्षात गुंतवणुकीचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यातल्या त्यात खासगी क्षेत्राच्या तुलनेत सरकारी गुंतवणुकीचे प्रमाण अधिक आहे. खासगी गुंतवणुकीचे प्रमाण २ टक्क्यांपेक्षा कमी राहिले आहे, याकडे अहवालात लक्ष वेधण्यात आले आहे.

देश आहे. भात, गहू, कापूस इत्यादी पिकांच्या उत्पादनात भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. तर दूध, कडधान्ये आणि मसाला पिकांचे सर्वाधिक उत्पादन घेणारा देश आहे. परंतु तरीही पीक उत्पादकतेच्या बाबतीत भारत इतर प्रमुख देशांच्या तुलनेत खूपच पिछाडीवर आहे. सरकारी मदतीचा सर्वाधिक वाटा भात आणि गहू या पिकांना जातो. तसेच जमिनीचे तुकडीकरण, शेतीमधील तुटपुंजी गुंतवणूक, कृषी यांत्रिकीकरणाचा अभाव, दर्जेदार निविष्ठांचा ◀◀ पान २ वर

# लातूरचे खासदार शिवाजी काळगे यांची खासदारकी धोक्यात?

## जात वैधता प्रमाणपत्रावर न्यायालयात याचिका दाखल

**लातूर । प्रतिनिधी**

**लातूरचे खासदार शिवाजी काळगे यांची खासदारकी धोक्यात येण्याची शक्यता आहे. कारण लोकसभा निवडणुकीत वापरलेल्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. वकिल योगेश उदगीरकर यांनी याबाबत न्यायालयात धाव घेतली आहे.**



लोकसभेचा निकाल लागून ४६ दिवस झाले आहेत. ४५ दिवसांची हायकोर्टाची इलेक्शन पीटीशन दाखल करण्याची मुदत होती, ती आता संपलेली आहे. लातूरचे निवडून आलेले उमेदवार काळगे यांच्याविरोधात आम्ही पर्वा रीट पीटीशन दाखल केली आहे. आपण त्यांच्याविरोधात दोन केसेस दाखल केलेल्या आहेत. आपण त्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राला चॅलेंज केलेले आहे. दुसरे म्हणजे इलेक्शन पीटीशनही आपण दाखल केलेली आहे, असे योगेश उदगीरकर म्हणाले. त्यांनी सांगितले की, शिवाजी काळगे यांनी १९८६ साली जात प्रमाणपत्र काढले होते, ते औरंगाबादच्या आयुक्तांनी रद्द केले. त्यांनी त्याठिकाणी सांगितले की दि.५ डिसेंबर १९८५ अन्वये संबंधित अधिकाऱ्यावर ◀◀ पान २ वर

# नीट गोंधळावरुन लोकसभेत सत्ताधारी-विरोधकांमध्ये खडाजंगी

## राहूल गांधी यांनी काढले सरकारच्या कारभाराचे वाभाडे



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान नीट च्या गोंधळावरुन सरकार आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी झाली. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर विरोधकांनी जोरदार निशाणा साधला. राहुल गांधी यांनी परीक्षा पद्धतीत अनियमितता असल्याचा आरोप करत शिक्षणमंत्र्यांवर प्रश्न उपस्थित केले. प्रत्युत्तर देताना शिक्षणमंत्र्यांनी नीट परिक्षेत पेपर फुटल्याचा कोणताही पुरावा नसल्याचा दावा केला. या मुद्द्यावर सरकारच्या उत्तराने असमाधानी झालेल्या विरोधकांनी सभागृहत्याग केला.**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी लोकसभेत 'नीट' चा मुद्दा गाजला. प्रश्नोत्तराच्या यादीत नीटशी संबंधित प्रश्न दुसऱ्या क्रमांकावर होता. काँग्रेस खासदार मणिकम टागोर यांनी नीट परीक्षा पद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आणि त्यातील गोंधळावरुन सरकारवर हल्ला चढवला. त्यांनी पुरवणी प्रश्नावेळी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. याच विषयावर समाजवादी पक्षाचे सर्वेसर्वा आणि खासदार अखिलेश यादव यांनी एका पुरवणी प्रश्नात विद्यार्थ्यांना ◀◀ पान २ वर

### "आयआयटी दिल्लीने तज्ज्ञांची समिती करावी-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्लीः वैद्यकीय शिक्षण प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर सोमवारी (दि.२२) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. परीक्षेतील दोन्ही पर्यायांना गुण दिलेल्या प्रश्न क्रमांक १९ च्या उत्तरावर आपले मत देण्यासाठी आयआयटी दिल्लीने तज्ज्ञांची समिती तयार करावी, या समितीने मंगळवारी दुपारपर्यंत आपला अहवाल सादर करावा, असे निर्देश सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने दिले. दरम्यान, नीट पेपरफुटी व गैरप्रकार प्रकरणी पुन्हा मंगळवार, २३ जुलै रोजी सुनावणी होणार आहे.

# ओबीसी आरक्षणावरुन लक्ष्मण हाकेंचा कडाडून हल्ला

## मुख्यमंत्री शिंदे, शरद पवार, जरांगे पाटील यांच्यावर निशाना; गेवराईत एकही ओबीसी आमदार का नाही

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याचा आतापर्यंत एकही आमदार ओबीसी नाही, आता मात्र बहुमताने करायचा आहे. दसरा, दिवाळी आली की आमचे लोक ऊसतोडीला जातात. तुम्ही आम्ही इथल्या व्यवस्थेला पर्याय दिला पाहिजे. निवडणूक आली की ओबीसी सेल जागा होतो. आमदार व्हायची वेळ आली की आम्हाला संधी दिली जात नाही. आपले हक्क, अधिकर टिकले पाहिजेत. समाजकारण करून भागणार नाही, राजकारण करावे लागेल सभागृहात गेले पाहिजे, असे म्हणत लक्ष्मण हाके यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह शरद पवार आणि जरांगे पाटील यांच्यावर निशाना साधला.



लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांच्या नेतृत्वात ओबीसी आरक्षण बचाव जनआक्रोश यात्रेला सुरूवात झाली आहे. सोमवार दि. २२ रोजी दुपारी बीड जिल्ह्यात या यात्रेचे आगमन झाले. गेवराई येथे लक्ष्मण हाके यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शरद पवार आणि मनोज जरांगे पाटील यांच्यावर सडकून टीका केली. ओबीसी आरक्षण तीन वर्षापासून ◀◀ पान २ वर

# आता अर्ध्या चड्डीत येऊ शकता!

## आरएसएसमध्ये सहभागी होण्यावर सरकारी कर्मचाऱ्यांवरील बंदी उठविल्याने काँग्रेसकडून खोचक टीका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने अलीकडेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्या कृत्य-कार्यक्रमांमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना सहभागी होण्यास बंदी घालणारा आदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील असलेल्या सरकारने नुकताच उठविला. मात्र केंद्र सरकारने घेतलेल्या या निर्णयावर काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी खोचक शब्दात टीका करत सरकारच्या निर्णयाची खिल्ली उडविली.**

जयराम रमेश यांनी एक्स वरील एका पोस्टमध्ये, पंतप्रधान कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाने ९ जुलै रोजी जारी केलेला आदेश शेअर करत, ज्यामध्ये १९६६ पासून लागू असलेल्या आएसएसच्या कार्यक्रमामध्ये किंवा त्यांच्या कृत्यांमध्ये भाग घेणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवरील बंदी हटवण्यात आली आहे. जयराम रमेश म्हणाले की, गांधीजींच्या हत्येनंतर सरदार पटेल यांनी फेब्रुवारी १९४८ मध्ये आरएसएसवर बंदी घातली होती. त्यानंतर चांगल्या वर्तनाच्या आश्वासनावर ही बंदी मागे घेण्यात आली होती. त्यानंतरही आरएसएसने नागपुरात तिरंगा फडकावला नाही. १९६६ मध्ये पुन्हा एकदा आरएसएसवर नव्याने बंदी घालण्यात आली होती. जयराम रमेश यांनी बंदी उठवल्याबद्दल भाजपा आणि केंद्र सरकारवर टीका केली आणि या बंदी उठविण्याच्या वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हणाले की, ४ जून २०२४ नंतर, जैविकदृष्ट्या न जन्मलेले पंतप्रधान आणि आरएसएस यांच्यातील संबंध बिघडले आहेत. त्यामुळेच ९ जुलै, २०२४ रोजी आरएसएसमध्ये सहभागी होण्यास सरकारी कर्मचाऱ्यांवरील बंदी उठविण्यात आली. यापूर्वी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कार्यकाळातही आरएसएसवरील ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ६.०० क्विंटल | २,३०० | ३,३०० | २,७०५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६९.५० क्विंटल | २,००१ | २,७१० | २,३२२ |
| मूग : १.०० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : ३.५० क्विंटल | ५,००० | १०,४५० | ७,७२५ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: २८.५० क्विंटल | २,३०० | ३,५०० | २,६६५ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ६२.५० क्विंटल | ४,४६० | ४,४६० | ४,४६० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०१ | ५,८५० |

# शरद पवारांनी घेतली मुख्यमंत्री शिंदेंची भेट

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख व खासदार शरद पवार यांनी सोमवारी (दि. २२) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथी गृहावर भेट घेतली. मराठा, ओबीसी आरक्षण आणि अन्य मुद्द्यावर दोघांमध्ये चर्चा झाल्याचे सांगितले जात आहे. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या भेटीत जलसंपदा, दुधाचे दर आणि साखर कारखान्यांचे काही प्रलंबित प्रश्न यासहित अनेक विषयांवर त्यांच्यात सखोल चर्चा झाल्याचे समजते.



### मराठा समाजाने सातबारा तुमच्या नावावर केलाय का-दरेकर

मुंबईः तुमच्या एका भूमिकेवर विषय मांडला तर मराठा समाजाचा अपमान कसा काय होतो. मराठा समाजाने सातबारा तुमच्या नावावर केलाय का? असा सवाल भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना विचारला आहे. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी अण्णासाहेब पाटील यांच्यापासून अनेक नेत्यांनी आंदोलने केली, बलिदान दिले. अनेक नेत्यांनी प्रचंड काम केले, अभ्यास करून ◀◀ पान २ वर






# एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सहा महिन्यांची मुदत

## मराठा समाजातील विद्यार्थ्यांना होणार फायदा

**मुंबई । प्रतिनिधी**

**अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना सन २०२४-२५ मध्ये विविध शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत मुदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. त्यामुळे आता विशेषत: मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत.**

राज्यात २० फेब्रुवारी २०२४ रोजी विशेष अधिवेशनाढ महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम (एसईबीसी) २०२४ एकमताने संमत करण्यात आला. या अधिनियमानुसार राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये आणि शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १० टक्के आरक्षण देण्यात आले. याचा फायदा प्रामुख्याने मराठा समाजाला झाला आहे. एसईबीसी अधिनियमाचा फायदा घेऊन शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी येत होत्या. यामुळे एसईबीसी विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मानवाच्या तांत्रीक मर्यादा उघड !

शुक्रवारी मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या सर्व्हरमध्ये तांत्रिक बिघाड झाला आणि जगातील कोट्यावधी संगणक, लॅपटॉपच्या स्क्रीनवर 'ब्लू स्क्रीन ऑफ डेथ'चा मॅसेज अवतरला. या मॅसेजने जगभरातील 'मायक्रोसॉफ्ट-३६५'ची सेवा ठप्प करून टाकली. या तंत्रकल्लोळाने मायक्रोसॉफ्टवर सायबर हल्ला झाल्याची चर्चा वाऱ्यासारखी पसरली. मात्र, सुदैवाने हा सायबर हल्ला नव्हता तर 'क्राऊडस्ट्राईक'ने केलेले एक सुरक्षाविषयक अपडेट या तंत्रकल्लोळास कारणीभूत ठरले. 'क्राऊडस्ट्राईक' ही सायबर सेक्युरिटी कंपनी आहे जी मायक्रोसॉफ्ट कंपनीला सायबर सुरक्षा पुरविण्याचे काम करते. मात्र, सुरक्षा पुरवितानाच चूक घडल्याने जगभर हा तंत्रकल्लोळ निर्माण झाला. त्याच्या परिणामी जगातील अनेक विमानसेवा बंद पडल्या, बँकांचे व्यवहार ठप्प झाले, एटीएम बंद पडले, शेअर बाजार खोळंबला, रुग्णालयांचे कामकाज बंद पडले. थोडक्यात एका क्षणात या तंत्रकल्लोळाने अवघे जग ठप्प करून टाकले. जगातील लाखो कार्यालये, लाखो संगणक, लाखो लॅपटॉप्स जागच्या जागी स्तब्ध झाली.

विमानसेवा कोलमडणे, बँकांचा व्यवहार ठप्प होणे, शेअर बाजाराचे कामकाज थांबणे अशा बाबींचा जबर आर्थिक फटका जगाला सहन करावा लागतो. तो सहन करावा लागू नये यासाठी स्वत: मायक्रोसॉफ्टने कोरोना काळात पुढाकार घेऊन जगातील कोट्यावधी लोकांना प्रशिक्षण दिले होते. मात्र, याच कंपनीला सायबर सुरक्षा देणाऱ्या कंपनीची चूक झाली आणि जगाला अब्जोवधी डॉलर्सचा जबर आर्थिक फटका बसला. केवळ आर्थिकच नव्हे तर लक्षावधी लोकांना शारीरिक त्रासही सोसावा लागला कारण जगातल्या अनेक रुग्णालयांचे कामकाज या तंत्रकल्लोळाने ठप्प केले. रुग्णालयांनी गंभीर रुग्णांवरील उपचार व शस्त्रक्रिया पुढे ढकलल्या. अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, सिंगापूर, फ्रान्स, स्कॉटलंड, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड या देशांना या तंत्रकल्लोळाचा सर्वात जास्त फटका बसला असला तरी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे जगातल्या सर्वच देशांना याचा कमी-अधिक फटका सहन करावाच लागला. भारतात इंडिगो, स्पाईसजेट, अकासा या कंपन्यांना मोठा फटका सहन करावा लागला आहे. या काही तासांच्या विश्वव्यापी तंत्रकल्लोळाने जगात एकूण किती अब्ज डॉलर्सचा चुराडा झाला याचा नेमका आकडा शोधण्यासाठी आता अनेक महिने अभ्यास सुरू राहील.

आर्थिक फटक्याबरोबरच या तंत्रकल्लोळाने अगणित मानवी तासही वाया घालविले आहेत. शुक्रवारी सायंकाळपर्यंत सगळ्या यंत्रणा सुरळीत सुरू झाल्याने जगाने सुटकेचा श्वास सोडला खरा पण या काही तासांच्या तंत्रकल्लोळाने घडविलेले नुकसान भरून काढण्यासाठी पुढचे कित्येक दिवस लागतील. या तंत्रकल्लोळाने जगाला तंत्रक्रांतीने निर्माण केलेल्या अपरिहार्य पराधीनतेची जाणीवच करून दिली आहे. आपले दैनंदिन आयुष्य प्रचंड वेगाने 'तंत्राधीन' बनत चालले आहे. अर्थात तांत्रिक क्रांतीच्या या प्रपातात कुणीच स्वत:ला बाजूला वा वेगळे ठेवू शकत नाहीच. कोणतेही तंत्रज्ञान वा तंत्रसाधने न वापरणाऱ्या वा वापरू न शकणाऱ्यांची आयुष्येही या तंत्रक्रांतीने अलगद आपल्या कवेत घेतली आहेत. त्यामुळे रुग्ण म्हणून रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गेलेल्या लक्षावधी लोकांना या तंत्रकल्लोळाचा फटका सहन करावाच लागला. तंत्रज्ञानाच्या प्रगतीने व जास्तीत जास्त वापराने समाजातील अनेक प्रश्न, समस्या, अंतर्विरोध कमी होतील हाच सर्व कंपन्यांचा दावा असतो. तो काही प्रमाणात योग्यही आहे. मात्र, तो पूर्णपणे योग्य नाहीच, हे या तंत्रकल्लोळाने दाखवून दिले आहे. हा तंत्रकल्लोळ चुकीने झाला हे स्पष्ट झाल्याने जगाला हायसे वाटले खरे पण अशा चुका ठरवून केल्या जाणार नाहीतच याची काय शाश्वती आहे? अशीच संकटे जर वारंवार येत राहिली तर जगाला किती आणि काय-काय सोसावे लागेल या विचारानेही थरकाप उडतो. योगायोग म्हणजे १९ तारखेला विज्ञान कथा दिन होता. जगभरात ज्या विज्ञान कथा लिहिल्या गेल्या त्यात असे तंत्रकल्लोळ जगात काय-काय उत्पात घडवू शकतात याची रंजक-थरारक-रोमांचक व मनाचा ठाव घेणारी कल्पनाचित्रे रंगविण्यात आली आहेत. मात्र, सत्य वा वास्तव कल्पनेपेक्षाही जास्त विदारक व त्रासदायक असू शकते याची अनुभूती या तंत्रकल्लोळाने जगाला दिली आहे.

एकंदर तांत्रिक प्रगतीने मानवी जीवन सुकर व वेगवान केले असले तरी त्याची पराधीनता संपुष्टात आली, असे मात्र अजिबात नाही. उलट अगोदर निसर्गासमोर पराधीन असणारा मानव आता स्वत:च जन्माला घातलेल्या तंत्रज्ञानासमोरही पराधीनच ठरतो आहे. त्यावर तंत्रक्रांती जोवर उपाय शोधत नाही तोवर असे तंत्रकल्लोळ जगाला वेठीस धरत राहणार, मोठे नुकसान करत राहणार व मानवाला 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' याची जाणीव करून देत राहणार.

# कॅनरा बँकेत मॅनेजर व कॅशियरची हुकूमशाही

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड मध्ये कॅनरा बँक शाखेत नुकताच हजर झाल्याने नवीन बँक मॅनेजर व कॅशियर यांच्या संगणमताने हुकुमशाही प्रमाणे कामकाज सुरू असल्याचे दिसून आले आहे. हा प्रकार गुरुवारी रोजी एका दिवंगत व्यक्ती व शैक्षणिक मुली सोबत प्रकार घडला हे सर्व प्रकरण एका पत्रकार समक्ष घडलं आहे याबाबत थोडक्यात माहिती अशी की बँक मॅनेजर खातेदार व्यक्तींना त्याच्या मर्जीप्रमाणे वागणूक देत आहे तसेच दिव्यांग व्यक्तीला तात्काळ सेवा देणे नियमानुसार गरजेचे आहे परंतु त्या व्यक्तीला तिथे बसून ठेवण्याचा सल्ला कॅशियर यांनी केला आहे सदरील बँकेमध्ये पासबुक मध्ये एन्ट्री केल्या जात नाही फक्त पासबुक पैसे काढताना फक्त पासबुक मागितल्या जात आहे या संदर्भात बँक मॅनेजर यांना विचारले असता ते म्हणाले की आमचं प्रिंटर खराब आहे परंतु त्यांच्या बँकेतल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेसाठी प्रिंटर सुरू असल्याचे दिसून आले आहे या बँकेमध्ये फार मोठे घोटाळे बँकेतल्या कर्मचाऱ्यांनी केलेले आहे हे घटना सत्य आहे या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे असाच प्रकार बँक मॅनेजर व कॅशियर यांच्याकडून बँकेत घोटाळा होण्याची शक्यता आहे आता सध्या




कार्यरत असलेले बँक मॅनेजर व कॅशियर यांच्याकडे मुख्य हेड ऑफिस कॅनरा बँक बेंगलोर यांनी लक्ष देणे गरजेचे आहे नसता या बँकेमध्ये बँक मॅनेजर व कॅशियर या दोघांच्या संगनमताने खातेदारांना उद्धट भाषांमध्ये बोलून वागणूक दिल्या जात आहे जात आहे या दोघा कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात यावे अशी मागणी सर्वसामान्य खातेदाराकडून करण्यात येत आहे. सदरील कॅनरा बँक मध्ये कॅश आणताना कोणतेही सुरक्षेची काळजी घेतल्या जात नाही याप्रकरणी मुख्य हेड ऑफिस बेंगलोर यांनी तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे. या सदरील सर्व प्रकरण संदर्भात नवीन आल्याने बँक मॅनेजर यांना विचारले असता त्यांनी कॅशियर यांचं पाठ राखण केलं तसेच कॅशियर यांना विचारण्याचा प्रयत्न केला परंतु कॅशियरने खाली घातलं हो बोलण्यास नकार त्याला

# केस गळती आणि उपाय

केस गळणे हा मुळतः आजार नाही तर, ही एक नैसर्गीक प्रक्रिया आहे.

मग आजार कशाला म्हणावे ??

गळालेल्या केसांच्या ठिकाणी नविन केस न येणे हा आजार आहे.



जशी झाडाला नविन पालवी फुटव्यागोदर झाडाची पान गळती सुरू होते; तसेच मानवी शरीरात देखील केस गळणे चालुच असते परंतु त्या ठिकाणी नविन केस न येण्याचे कारण काय आणि त्यावर उपाय काय ??

या वरील उपाय अगदी सोपे आहेत...

**प्रथम उपाय :-**

सर्वोत्तम उपाय म्हणजे,

१)आहार - विहार :-

- केसांवर परिणाम करणारा सर्वात मोठा घटक. अवेळी जेवण, उपवास,, म्हणजे बाहेरचे आरोग्यास अहितकर असे जेवण

केसांना योग्य वेळी, योग्य पोषण न मिळाल्याने केसांची मुळे कमकुवत्? होतात.

- नैसर्गिक रित्या मिळणारे प्रथिने (proteins) कॅल्शियम(ca)हे घटक केसांना मजबुत बनवतात.

-तसेच वेळेवर विश्रांती (झोप) हा ही घटक गळतीला प्रोत्साहन देतो. म्हणून वेळेवर पूर्ण करणे महत्त्वाचे आहे.

- २)मानसिक ताण -

-ताणतणावाचे जीवन सतत मानसिक ताण हा केसांसाठी घातक ठरतो, मानसिक ताण कमी करण्यासाठी योगा,ध्यान, प्राणायाम इ. करून ताण कमी करण्याचा प्रयत्न करावा.

- टोपी, रुमाल, हेल्मेट इ.डोक्यावर घट्ट बांधल्याने केसांना होणारा रक्तपुरवठा कमी होतो पण सुरक्षेच्या दृष्टीने हेलमेट गरजेचे असल्याने दर थोड्या थोडया वेळाने काढणे वा केसांवरून हात फिरवून मग परत घालणे.

- सिगारेट, बीड़ी, तंबाखु तसेच निकोटीन असलेल्या पदार्थ सेवन बंद करावे कारण त्यामुळे केस गळती अधिक वेगाने होते.

-३)केसांचा व्यायाम (मालिश) -

-जसे शारीरीक व्यायामाने शारिरस्वास्थ, योगा केल्याने मानसीक स्वास्थ लाभते अगदी तसेच केसांच्या आरोग्या करीता केसांचा व्यायाम आवश्यक असतो.

केसांच्या मुळाशी (roots) तैल टाकून बोटांच्या टोकांनी हळूवार घासावे (rubbing) नंतर लगेच बोटांनी अलगद थपकी (tapping) द्यावी, ३ min (rubbing-tapping) करून (5-6 min)सपाट जमिनीवर पडून राहवे यामुळे केसांना होणारा रक्त पुरवठा वाढून केसांना पोषण मिळण्यास मदत होते.

४)केसांसाठी योगासने:-

१)प्रसरीत वदोत्तासन - Wide legged standing forward bend

२)उत्तनासन- Standing forwad bond

**डॉ.स्नेहा सुनिल साखरे**

# संजय गांधी निराधार योजनेमध्ये पैसे घेऊन बोगस लाभार्थ्यांची निवड

**अंबड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागासाठी शासनाने गोरगरिब लोकांचे हाल होऊ नये. म्हणुन प्रत्येक सर्कल साठी महा ई सेवा केंद्राची आयडी देण्यात आलेली आहे. परंतु तहसिल कर्मचारी व उपविभागीय अधिकारी कार्यालयामधील कर्मचारी यांच्या कृपेमुळे ग्रामीण भागातील आयडी तहसिल कार्यालय समोर व अंबड मध्ये कर्मच्याऱ्या च्या कृपेमुळे सरास चालु आहेत.पुरावठा विभाग मधील राशन कार्ड ची मागणी केल्यास राशन कार्ड नसल्यास सांगतात



परंतु दलाल मार्फत राशन कार्ड ची मागणी झाल्यास तहसील पुरवठा भागातील कर्मचारी पैसे घेऊन राशन कार्ड दिल्या जातात तसेच पैसे न दिल्यास राशन कार्ड ची ऑनलाइन प्रिंट बाहेरून काढून घ्या असं उत्तर पुरवठा विभागातील कर्मचाऱ्याकडून केल्या जातात याप्रकरणी पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार श्री विश्वास धर्माधिकारी यांनी पुरवठा विभाग मध्ये पैसे मागणारे कर्मचाऱ्यांची चौकशी करावी अशीही मागणी करण्यात येत आहे .काही दिवसापूर्वी पाचोड नाका येथे प्रहार दिव्यांग क्रांती संघटने मार्फत रस्ता रोको आंदोलन चालु करण्यात आले होते. मा. तहसिलदार यांच्या आश्वसनामुळे आंदोलन सोडण्यात आले . परंतु आज पर्यंत आश्वासन पूर्ण झालेले नाहीत.मागील मिटींग मध्ये संजय गांधी निराधार योजने मध्ये पैसे घेऊन बोगस लाभार्थ्यांचे निवड करण्यात आलेली आहे. मागील मिटींग मधील सर्व लाभार्थ्यांची चौकशी करणे बाबत.दिव्यांगाना व्यवसाय करण्यासाठी महा ई सेवा सेतु सुविधा नविन आयडी उपलब्ध करुन देणे बाबत. करण्यासाठी महा ई सेवा सेतु सुविधा नविन आयडी उपलब्ध करुन देणे बाबत.डि.बी.टी. फॉर्मसाठी आधार लिंक करण्यासाठी दिव्यांगाना स्वतंत्र आधार केंद्र देण्यात यावे. सदरील सर्व मागण्या १३ ऑगस्ट २०२४ पर्यंत पुर्ण करण्यात याव्यात अन्यथा तहसिल कार्यालय परिसरात दि. १४ ऑगस्ट रोजी बेमुदत उपोषण बसण्यात येईल. याची आपण गांभीर्याने दखल घ्यावी. अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटना जिल्हाध्यक्ष मोहन मुंडे यांच्या कडून तहसीलदार यांना निवेदना द्वारे करण्यात आली आहे.

## पान १वरून...

### मान्सूनच्या फटक्यान

अपुरा पुरवठा आणि शेतीमालाच्या विक्रीव्यवस्थेशी संबंधित तुटपुंज्या पायाभूत सुविधा ही कमी उत्पादकतेची प्रमुख कारणे आहेत, असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. शेतीसाठीच्या कर्जपुरवठ्यात २०२०-२१ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये दीडपट वाढ होऊन तो २०.७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. परंतु तरीही मॉन्सूनचा फटका बसल्यामुळे शेती क्षेत्राची मंद गतीने वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे.

----------

### नीट गोंधळावरुन लोकसभेत

सर्वाधिक गुण मिळालेल्या केंद्रांची यादी सरकार जाहीर करणार का, असा सवाल केला. जोपर्यंत हे मंत्री राहतील तोपर्यंत मुलांना न्याय मिळणार नाही, असेही ते म्हणाले. यावर शिक्षणमंत्र्यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विद्यार्थ्यांची संपूर्ण यादी सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यानंतर राहुल गांधी यांनी पुरवणी प्रश्न विचारले. त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना आव्हान दिले की, काय चालले आहे ते मला माहीत नाही. देशाने हे समजून घेण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. ही फक्त नीट परीक्षा नसून सर्वच परीक्षांमध्ये गोंधळ आहे. सध्या काय चालले आहे या चिंतेने संपूर्ण देश चिंतेत आहे. देशातील परीक्षा पद्धती निरर्थक बनली आहे. जो श्रीमंत आहे, ज्याच्याकडे पैसा आहे, तो भारतीय परीक्षा पद्धती विकत घेऊ शकतो, असा लोकांचा विचार होऊ लागला आहे. त्यात सुधारणा करण्यासाठी सरकार काय करत आहे, असा सवाल राहुल गांधी यांनी केला. याप्रकरणी सरकारची बाजू मांडताना शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांच्यावर हल्लाबोल केला. विरोधकांची राजीनाम्याची मागणी फेटाळून लावत त्यांनी सांगितले की, जनतेने दिलेल्या पाठिंब्यामुळेच आम्ही येथे आहोत. तुमच्या प्रमाणपत्राची गरज नाही. आमचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जनतेने पंतप्रधानपदाची जबाबदारी दिली आहे. त्यांच्या निर्णयानुसार मी सभागृहात उत्तर देत आहे. ते म्हणाले की, आरडाओरडा केल्याने सत्य बदलत नाही. राहुल गांधींवर निशाणा साधत ते म्हणाले की, देशातील परिक्षांबद्दल जे काही बोलले जात आहे ते निरर्थक आहे, विरोधी पक्षनेत्याच्या या विधानापेक्षा दुर्दैवी काहीही असू शकत नाही. या वक्तव्याचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. एनटीएने २४० हून अधिक परीक्षा यशस्वीपणे पार पडल्या आहेत, अशी माहितीही शिक्षणमंत्र्यांनी दिली.

------------

### लातूरचे खासदार शिवाजी

कारवाई करावी. म्हणजेच ज्यांनी त्यांचे जात प्रमाण काढणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी, असे आयुक्तांनी म्हटले होते. त्यानंतर महाराष्ट्र शासनानेही त्यांचे जात प्रमाणपत्र रद्द केले. लातूर लोकसभेत भाजपाने दोन वेळेस इथे प्रचंड मताधिकाने विजय मिळवला होता, मात्र २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला चांगलाच हादरा बसला. यावेळेस हॅट्रिक करण्यासाठी भाजपाने सर्व प्रयत्न केले. मात्र मतदारांनी डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या बाजूने कौल दिला. डॉक्टर शिवाजीराव काळगे यांना सहा लाख नऊ हजार एकवीस मते मिळवण्यात यश आले तर निकटचे प्रतिस्पर्धी भाजपाचे सुधाकर शृंगारे यांना पाच लाख ४७ हजार १४० मते पडली. डॉक्टर शिवाजी गाडगे यांनी ६१,८८१ मताची भरघोस आघाडी मिळवून यश संपादन केले. अनुसूचित जातीसाठी हा मतदारसंघ राखीव होता. यावेळेस काँग्रेसने लिंगायत समाजातून येणाऱ्या डॉक्टर शिवाजीराव काळगे यांना उमेदवारी दिली याने चुरस निर्माण झाली होती. भाजपने विद्यमान खासदार सुधाकर शृंगारे यांना दुसऱ्यांदा संधी दिली. मराठा आरक्षणाच्या विषयामुळे नाराज असलेला मराठा समाज भाजपापासून दुरावला होता, त्यामुळे काँग्रेसला यश मिळाल्याचे बोलले जात आहे.

------------------

### आता अर्ध्या चड्डीत

बंदी लागू होती. नोकरशाही आता अर्ध्या चड्डी मध्ये देखील येऊ शकते, अशी खोचक टीका त्यांनी केली.

**आरएसएस संविधान विरोधी - प्रकाश आंबेडकर**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्णपणे भारताला धर्मनिरपेक्ष राज्य म्हणून स्वीकारतो का आणि त्यांना भारताचा राष्ट्रध्वज मान्य आहे का, ते भारतीय संविधानाशी एकनिष्ठ आहेत का? असे सवाल वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी भाजपा आणि आरएसएस यांच्यावर निशाणा साधत विचारला. प्रकाश आंबेडकर म्हणाले की, तुम्हाला माझ्या प्रश्नाचे उत्तर कळाले असेल. उत्तर नाही आहे. आरएसएस धर्मनिरपेक्ष भारतविरोधी आहे, आरएसएस तिरंगाविरोधी आहे, आरएसएस संविधान विरोधी आहे. एखादा सरकारी कर्मचारी आरएसएस आणि त्यांच्या विभाजनवादी विचारसरणीशी एकनिष्ठ असेल तर तो भारताशी एकनिष्ठ कसा असू शकतो? असा सवालही त्यांनी यावेळी केला.

----------

### ओबीसी आरक्षणावरुन लक्ष्मण

कोर्टात आहे म्हणून निवडणुका नाहीत. यावर सरकार काही बोलत नाही. लोकसभा, विधासभेत तुमचे आमचे प्रतिनिधित्व पोहचत नाही. समांतर आरक्षणमुळे ४५०० हजार नोकऱ्यांचे नुकसान झाले. आता १८ पगड जातींच्या लोकांनी एक झाले पाहिजे. यशवंतराव चव्हाण म्हणाले होते हा महाराष्ट्र मराठी माणसांचा होणार, मात्र आता चित्र वेगळे आहे. प्रविण दरेकर म्हणतात मनोज जरांगेसाठी आम्ही काय नाही केले. एकीकडे अण्णासाहेब पाटील मंडळाला बिनव्याजी कर्ज का दिले? दुसरीकडे तालुक्याच्या ठिकाणी ओबीसींचे एकही वसतिगृह नाही. जरांगे पाटलांना ज्या लेटर हेडवर पाठिंब्याचे पत्र दिले, तसे आम्हाला देणार का? कोण आहेत पंडित? असा सवाल लक्ष्मण हाकेंनी थेट मुख्यमंत्र्यांनाच जाब विचारला आहे. मनोज जरांगे यांच्यावर टीका करताना हाके म्हणाले, तुमचे आणि ओबीसींचे भांडण नाही तर मग ओबीसीमधून आरक्षण का पाहिजे? मराठा आंदोलनात एक कुणबी, लाख कुणबी अशी घोषणा कधीच दिली गेली नाही. सगेसोयरेंच्या माध्यमातून आरक्षण संपवण्याचा घाट आहे. आमच्या एखाद्या बहिणीने उच्चवर्णीय मुलासोबत लग्न केले तर तुम्ही त्यांनाही आरक्षण देणार का? आम्ही ६० वर्षे खाल्ली म्हणून हिणवले जाते. आतापर्यंत किती कारखाने, बँका आम्हाला दिल्या. यांची वर्चस्ववादाची लढाई आहे, गरजवंताची नाही, असा थेट हल्ला हाके यांनी मनोज जरांगेंवर केला. प्रस्थापितांना तिकीट द्यायची वेळ आली की, पाहुण्यांना लाभ दिला. तुम्ही शेकडो वर्षाचे शासक आहात. पवार साहेबांनी १८ पगड जातीचे अंतःकरण समजून घेतले असते तर आज ही वेळ आली नसती. आता आमच्या ताटातले तुम्हाला पाहिजे. कारखाने बंद पडले की तुम्ही खैरात वाटता. संविधान कुणामुळे धोक्यात आहे आता समजून घेतले पाहिजे, अशी थेट टीका हाके यांनी शरद पवारांवर केली.

---------

### मराठा समाजाने सातबारा तुमच्या

समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. तुमच्या एका भूमिकेवर विषय मांडला तर मराठा समाजाचा अपमान कसा काय होतो. मराठा समाजाने सातबारा तुमच्या नावावर केलाय का? असा सवाल भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना विचारला. दरेकर म्हणाले की, जरांगे यांनी सबुरीने घेण्याची गरज आहे. तुम्ही मॅनेज होत नाहीत हिच तुमची ताकद, सामर्थ्य आहे. हे मराठा समाजाला माहित आहे. म्हणून समाज आपल्या पाठीशी उभा आहे. पण तुम्हाला कुणी काही बोलले तर त्याला शिवराळ भाषा, एकेरी, हमरीतुमरी बंद केले पाहिजे. स्वतःची वक्तव्य मुजोरपणासारखी वाटतात आणि दुसऱ्याला मुजोरडा, माजोरडा बोलायचे. एका आंदोलनाच्या यशामुळे डोक्यात हवा जाऊ देऊ नका. राजकारण करण्यापेक्षा समाजाच्या प्रश्नांचे नेतृत्व करा. सरकार मराठा समाजासाठी काय करतेय ते आम्ही दाखवले. मराठा समाजासाठी ज्यांनी पहिले बलिदान दिले ते अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र नरेंद्र पाटील यांनी पुस्तिका तयार केली आणि एक लाख बेरोजगार मराठा तरुणांना उद्योजक बनवले तेही जाहीर केले.

-----------

### एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना

मिळण्याची मागणी करण्यात येत होती. या मागणीचा सकारात्मक विचार करुन प्रमाणपत्र सादर करण्यास वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याच्या सहा महिन्यापर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतला आहे.

## पान ६ वरून...

### उपमुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांच्या

लखेरा, संतोष चिमणे, भारत जोगदंड, यांच्यासह राजकिशोर मोदी मित्र मंडळाचे अनेक कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा ना धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिर संपन्न करण्यासाठी पथक प्रमुख डॉ प्रेरणा जांभुळकर, डॉ रवी गुंडरे, शशिकांत पारखे, किरण चव्हाण, सय्यद मुश्ताक,जगदीश रामदासी , वाल्मिक कांबळे, सय्यद मुस्कान फेरोझ, प्रियंका राऊत या रक्तपेढी कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले. शेवटी राजकिशोर मोदी व उपस्थित सर्व सहकाऱ्यांनी ना अजितदादा पावरवव धनंजय मुंडे यांनात्यांचा वाढदिवसानिमित्ताने शुभेच्छा देऊन दोघांनाही निरोगी दीर्घायुष्य लाभावे अशी प्रार्थना केली.

------------

### जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे

दिलेल्या तारखेचा अवमेळ तर उपविभागीय कार्यालयाकडून विभागीय कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठवणे यामध्ये जो मोठा कालावधी जातो त्यामुळे दिरंगाई होते यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असून प्रचंड नाराजीचा सूर शेतकरी वर्गामध्ये असल्याचे निदर्शनास आणून दिले.यावर तात्काळ दखल घेत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री राजेश कुमार यांनी संबंधित सचिव, तसेच जिल्हाधिकारी बीड यांना याबाबत पुढील ४५ दिवसात ही सर्व प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्याचे आदेशित केले. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी मंगळवारपासून संबंधित भूमिअभिलेख कार्यालयाशी संपर्क करून शेतकऱ्यांनी आपली प्रलंबित असलेली मोजणी पूर्ण करण्याचे आवाहन माजी मंत्री सुरेश धस यांनी केले आहे.

---------

### आष्टीमध्ये ३१ लाखाचा

अंमलदार यांनी तपासणी केली असता, त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंध घातलेल्या अन्न पदार्थ गुटखा व तंबाखू आढळून आला ज्यामध्ये विमल,आर एम. डी, सुगंधित तंबाखू अशा विविध प्रकारच्या गुटख्याच्या पिशव्या व त्यात त्यांची हजारो पाकिटे आढळून आली. त्याची किंमत तब्बल ३१ लाख रुपये असुन,२० लक्ष रुपये किंमतीचा आयशर असा एकूण ५१ लक्ष रुपये किंमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आष्टी पोलीस ठाणे येथे अन्न व औषध प्रशासन सुरक्षा अधिकारी प्रशांत अजिंठेकर यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदरील कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी चौरे ,यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी पोलीस स्टेशन चे सपोनी सचिन इंगेवाड, त्यांचे सहकारी अंमलदार राठोड,जाधव,कांदे, शेळके, घाणे, काकडे, देवळे,पांढरे, पवार,यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

-----------

### पदोन्नती प्रक्रिया राबवून विषय

गोसावी यांच्याशी तातडीने संपर्क साधून मंजी मंत्री क्षीरसागर यांनी बीड जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आदेश देण्याची विनंती केली. त्यानुसार शिक्षण संचालक यांनी जिल्हा परिषद अंतर्गत पदभरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विज्ञान व गणित विषयाचे विषय शिक्षक पदोन्नती प्रक्रिया राबवण्याचे आदेश दिले आहेत.कार्यरत असलेल्या शिक्षकांपैकी रिक्त पदांच्या मर्यादेत सेवाजेष्ठता शिक्षकांमधुन गुणवत्तेनुसार इयत्ता ६ वी,७ वी,८ वी करीता विषय शिक्षकांच्या पदोन्नतीची प्रक्रिया राबवण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

------------

### पोलिस, महसूल प्रशासनाच्या दुर्लक्ष

वास्तविक महसुल, पोलिस प्रशासनातील अधिकाऱ्यांकडून डोळेझाक होत असल्याने लाखो रूपये महसुल बुडत आहे. कारवाई करण्या ऐवजी महिन्याकाठी आर्थिक वाटाघाटी करून हप्तेखोरी सुरू आहे. महसुल व पोलिसांच्या समोरून वाळुची वाहने जात असुन देखील कसलीच कारवाई होत नाही. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून यांची दखल घेऊन तालुक्यातील वाळु उपसा व अवैध होत असलेली वाहतूक थांबवावी.त्याच बरोबर महसुल व पोलिस याच्या मिलीभगतीने हा गोरख धंदा सुरू आहे.

------------

### स्वत:ची गुणवत्ता विकसित

अध्यक्षीय समारोपात चंद्रकांत मुळे म्हणाले की,प्रारंभी अपयशच पदरी पडत असते नंतर यश जागा घेते त्यामुळे अपयशाने खचुन न जाता प्रयत्न करावेत. या प्रसंगी ५५ गुणवंतांचा गौरव करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.महेश अकोलकर यांनी, संचालन डॉ. संकेत तोरंबेकर यांनी केले कॉटन किंग यांच्या वतीने गुणवतांना कूपन चे वाटप करण्यात आले. शालांत परीक्षेत शंभर टक्के गुण घेणाऱ्या दोन विद्यार्थिनींना डॉ.प्रविण जोशी यांच्या वतीने बक्षीसे देण्यात आली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पेशवा प्रतिष्ठान महिला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी, सदस्यांनी परिश्रम घेतले.

-----------

### अल्पवयीन मुलीस फूस लावून अपहरण

थो ना १०६९ प्रविण श्रीरसागर, यो शी १९०८ मजरुद्दीन सय्यद, पो शी ६५८ राजाभाऊ सजगणे यांना मोहिमेवर पाठविले होते. पथकाने उरुळी कांचन गाठून शोध घेण्यास अडचणी निर्माण झाल्या २ दिवस तळ ठोकून नर्सरी मध्ये काम करत असताना त्याला ताब्यात घेण्यात आले. ह्या पथकाने मोबाईल ट्रेस करून मुलीस ताब्यात घेऊन आरोपीस उरुळी कांचन वेसून जेरबंद केले सदर पीडित मुलीस व आरोपीस पोस्टला हजर केले व सदर पीडित मुलीच्या जवाब आवरून पोस्कोचा गुन्हा शनिवारी रात्री दाखल करण्यात आला असून आरोपीस न्यायालयात हजर केले असता २ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे है करत आहेत. आरोपीच्या मुलीसह मुसक्या आवळीत जेरबंद केले यामुळे पोलिसांचे कौतुक होत आहे.

-----------

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका उपाध्यक्षपदी सय्यद तोफिक यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाच्या तालुका उपाध्यक्षपदी सय्यद तोफिक (लाला) यांची निवड झाल्याचे नियुक्तीपत्र तालुकाध्यक्ष तथा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी दि २२ जुलै सोमवार रोजी दिले. शहरातील सय्यद तोफिक यांना माजलगाव तालुका उपाध्यक्षपदी दिलेल्या नियुक्तीपत्रात असे नमूद केले आहे की,पक्ष बळकटीसाठी पक्ष संघटनेच्या कार्यासाठी राष्ट्रीय पक्षाध्यक्ष अजित पवार ध्येय धोरण व विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आ.प्रकाश सोळंके यांचे हात बळकट करण्यासाठी सय्यद तोफिक (लाला ) यांना दि २२ जुलै सोमवार रोजी तालुका उपाध्यक्षपदाचे नियुक्तीपत्र तालुकाध्यक्ष तथा बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे यांनी दिले.



दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि.२३ जुलै २०२४



# आष्टी तालुक्यातील अरणविहीरा येथे पाणंद रस्ते बोगस

## पाणंद रस्त्याचे शून्य काम असतानाही तालुक्यात बिले अदा करण्याचा धडाका

### » सखोल चौकशी करा अन्यथा आत्मदहनाचा ग्रामस्थांचा इशारा



**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील अरणविहिरा ते रामगुडे वस्ती हा गेल्या दोन वर्षांपूर्वी झालेल्या रस्त्यावर पुन्हा २०२० साली एमआरईजीएसच्या माध्यमातून यावर शासनाचा सुमारे २१ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. मात्र सदरील रस्त्यावर एक टोपले देखील कसल्याच प्रकारचे टाकण्यात आलेले नाही तरीपण या रस्त्याचे ६ जून २०२४ रोजी अकुशलचे बिल अदा करण्यात आले.मात्र ८ जून २०२४ रोजी गावातील उद्धव शिरसाठ यांनी या रस्त्याबाबत आणि बोगस कामाविषयी आष्टी तहसीलदार यांना लेखी निवेदन दिले मात्र या निवेदनावर कसल्याच प्रकारची दखल आष्टी तहसीलदार यांनी घेतली नसल्याचा आरोप उद्धव शिरसाठ यांनी केला तसेच शिरसाट यांनी गावात सुरू असलेल्या सीसीटी बांधबंधिस्ती बाबत देखील बोगस काम होत असल्याची रीतसर तक्रार तहसील प्रशासनाकडे केली असून यावर देखील प्रशासन डोळेझाक करत असल्याचा प्रकार दिसून आल्याने शिरसाठ यांनी येत्या चार दिवसात या प्रकरणावर सरकारने दखल घेतली नाही तर आष्टी तहसील कार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे.**

ग्रामरोजगार सेवक रघुनाथ रामगुडे ग्रामरोजगार सेवक आहे.मला यांनी सीसीटी कामाचे कसल्याही प्रकारची कल्पना न देता दोन कामे जे की २५-२५ लक्ष रुपयांची आहेत पैकी ३.५० लक्ष रुपये आयडी पासवर्ड माझा दिलेला नसताना उचलले असल्याचा आरोप करत त्यामुळे ही शासनाची दिशाभूल लक्षात आल्यानंतर संबंधित गुत्तेदाराला या प्रकाराबाबत विचारणा केली असता त्यांनी मला पैशाचे आमिष दाखवण्याचे काम केले. मात्र मी माझ्या कामाशी प्रामाणिक असल्याने माझी दिशाभूल करून शासनाची लूट करणाऱ्यांच्या आणि शासन तिजोरीवर डल्ला मारणाऱ्यांच्या सोबत जाणे मला पटणारे नाही.त्यामुळे संबंधित झालेल्या गैरव्यवहारात माझा कसलाही संबंध नाही याबाबत शासन दरबारी जी काही चौकशी व्हायची असेल ती चौकशी होऊन संबंधितावर कारवाई होणे गरजेचे असल्याचे मत ग्रामरोजगार सेवक रामगुडे यांनी व्यक्त केले. आष्टी तालुक्यातील पाणंद रस्त्याचे अनेक कामे बोगस झाल्याच्या तक्रारी येत असून याकडे प्रशासन अर्थपूर्ण दुर्लक्ष देत असल्याचं समोर येत आहे. अनेक गावांनी लक्षावदी रुपये अकुशलचे उचलले असून त्या ठिकाणी टोपलंही टाकलं नसल्याचे निदर्शनात आले आहे.

### पाणंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची की कार्यकर्त्यांच्या

शेतकऱ्यांच्या शेतमाल ने आन करण्यासाठी या रस्त्याचा प्रामुख्याने वापर व्हावा यासाठी ही योजना सरकारने अमलात आणले असून ही योजना फक्त कागदपत्रीच पाहायला मिळत असून प्रत्यक्षात तालुक्यातील कोणत्याही गावात ही योजना प्रभावीपणे राबवलेली पाहायला मिळत नसून नुसती दागडूज करून कामे झाल्याच्या अनेक तक्रारी समोर येत असून ही योजना कार्यकर्ते पोसण्याची योजना आहे का ? असा सवाल शेतकरी वर्गातून विचारला जात आहे.

## भारतीय जनता पार्टीच बीड विधानसभेत प्रबळ दावेदार-शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

२०२४ महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भाजपा महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेकडून बीड मतदार संघावर दावा व्यक्त केला जात आहे. परंतु आज बीड मतदार संघाची राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. मागील विधानसभा निवडणुकींचा विचार केला तर, हे दावे फोल ठरणार आहेत. २००४ नंतर आजपर्यंत बीड मतदार संघात शिवसेनेला यश प्राप्त झालेले नाही. यापूर्वी भाजपाने बीड विधानसभा मतदार संघात शिवसेनेला विजय प्राप्त करून देण्यासाठी प्रामाणिकपणे भूमिका निभावली आहे. ओठात एक आणि पोटात एक अशी भूमिका कधीच घेतली नाही. परवा पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपा उमेदवार लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना मदत करण्याऐवजी शिवसेनेने अंधारातून विरोधकांना मदत केल्याचे समोर आले आहे. मागील विधानसभा निवडणुकीतील मतदानाची आकडेवाडी लक्षात घेता भारतीय जनता पार्टीचा जनाधार वाढला आहे. भाजपाच बीड विधानसभेचा प्रबळ दावेदार असून, बीड मतदार संघ भाजपाला मिळावा अशी मागणी भाजपा नेते नवनाथ शिराळे यांनी केली आहे.



२०१४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि शिवसेना युती तुटली आणि राज्यामध्ये स्वतंत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय झाला. यामध्ये स्वबळावर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारास ७१००० हजार मते मिळाली तर, शिवसेनेला ३०६९१ मते मिळाली. तसेच बीड नगरपालिका निवडणुकीत शिवसेनेपेक्षा अधिकची मते भाजपाच्या मुस्लीम उमेदवाराला मिळाली. खऱ्या अर्थाने बीड विधानसभा मतदार संघात कोणत्या पक्षाची ताकत वाढली हे सामान्य मतदार बांधवांना माहित आहे. तर क्षीरसागर कुटुंबाने कायम भारतीय जनता पार्टीला दुय्यम लेखून वेळोवेळी विरोध करण्याची भूमिका घेतलेली आहे. आता विधानसभेसाठी मदतीची अपेक्षा ठेऊन, दावेदारीच्या हालचाली सुरु आहेत. बीडचे विद्यमान आमदार हे शरद पवार गटाकडे असल्यामुळे या जागेवर दावा करणे योग्य वाटत नाही. वर्तमान पत्रामध्ये बातम्या छापून मते मिळणार नाहीत. क्षीरसागर नेहमीच बीड मतदार संघातील जनतेची दिशाभूल करतात यापुढे क्षीरसागरांच्या दिशाभूल तंत्राला जनता बळी पडणार नाही. असे मत भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे यांनी व्यक्त केले.




## डॉ.विमलताई मुंदडांना रोटरी भूषण पुरस्कार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील रोटरी क्लबतर्फे कै. विमलताई मुंदडा यांना मरणोत्तर रोटरी भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. नंदकिशोर मुंदडा व अक्षय मुंदडा यांनी हा पुरस्कार स्वीकारला. रोटरीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी समाजोपयोगी काम उभे करावे. अशी अपेक्षा रोटरीचे भावी प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी व्यक्त केली.**

येथील परिचय मंगल कार्यालयात रविवारी सायंकाळी रोटरी क्लबचा पदग्रहण सोहळा व रोटरी भूषण पुरस्कार वितरण समारंभ झाला. त्यात श्री. लातुरे बोलत होते. याप्रसंगी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, रोटरीचे सहायक प्रांतपाल हेमंत रामढवे, रोटरीचे नवनियुक्त अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, मावळते अध्यक्ष स्वप्नील परदेशी, सचिव गणेश राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूरे म्हणाले, की वसुधैव कुटूंब कम हा विचार रोटरी देत असते. यातून समाजाला आपले म्हणण्याची वृत्ती होत असते. समाजातील उपेक्षित घटकांना मदत व माणुसकीचा आधार देण्याचा प्रयत्न रोटरी क्लबच्या सदस्यांनी करावा असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी सत्काराला उत्तर देताना अक्षय मुंदडा म्हणाले, रोटरीचे क्लबचे कार्य हे नंदकिशोर व समर्पित भावनेने असते. माझ्या आईला मिळालेला हा पुरस्कार आमच्या एकट्या मुंदडा कुटुंबाचा नसून विमलताईंना ज्या मायबाप जनतेने सेवा करण्याची संधी दिली, त्यांचा हा पुरस्कार आहे. त्यामुळेच हा पुरस्कार आपण केज मतदार संघातील जनतेला समर्पित करीत आहोत असे त्यांनी जाहीर केले. विमलताई व नंदकिशोर मुंदडा यांनी कधीच राजकारण नव्हे तर फक्त विकासाची कामे केली. याचेच हे फलित असल्याचे त्यांनी सांगितले.

## वंचितचे गंगाधर सोनपसारे यांचा स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत प्रवेश



**माजलगाव । प्रतिनिधी**

**तालुक्यातील वंचित बहुजन यूवक आघाडीचे तालुका संघटक गंगाधर सोनपसारे यांनी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली सेनेत जाहिर प्रवेश केला आहे. तालुक्यातील दलित चळवळीचे खंदे समर्थक तथा सामाजीक कार्यकर्ते गंगाधर सोनपसारे हे गेली अनेक वर्षा पासुन वंचित बहुजन आघाडी मध्ये माजलगाव तालुका संघटक म्हणून समाजकार्य करत होते.**

माजलगाव मतदार संघात स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची चळवळ मोठ्या प्रमाणात पुढे येत असून सर्व जाती धर्माचे सामाजिक भान असलेले कार्यकर्ते विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी उत्सुक आहेत मतदार संघात शिव फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांची कास धरून तांडा वस्ती वाडी गाव तिथं शाखा स्थापन करण्यात येणार असल्याचे विजय साळवे यांनी सांगितले आहे . शहरातील हॉटेल व्यंकटेश येथे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधुन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वतीने खिरदान कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता या कार्यक्रमात वंचीत चे गंगाधर सोनपसारे यांनी स्वाभिमानी नेते विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत जाहीर प्रवेश केला प्रसंगी पंडित ओव्हाळ बालासाहेब शिंदे अंजेराम घनघाव शेख मजहर वशिष्ठ लांगडे विशाल ससाणे विश्वनाथ तोडके भास्कर पौळ धम्मा गावडे सय्यद अनवर साहेबा टाकणखार आनंद साळवे शेख अर्शद बबन भालेराव राजेश टाकणखार सखाराम चोपडे श्रीधर डोंगरे धैर्यशिल ढगे सोनाजी गायकवाड बाळू साळवे अशोक निकाळजे वैजनाथ गडसिंग ग्यानबा मस्के सिद्धार्थ गाडेकर केशव चोपडे अजय साळवे राहूल मस्के राजु किर्ते चद्रकांत टाकणखार बाबा पोटभरे गौतम सोनपसारे रमेश पौळ विलास खळगे कन्हैय्या बनगे सुरेश साळवे सुमित पोटभरे बाबा खरात यांची उपस्थिती होती.

## परळीतील तिसऱ्या डोळ्यास भुरट्या चोरांचे आव्हान

### आठवडी बाजारातून मोबाईलची चोरी

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरात कोट्यवधी रुपये खर्च करून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमे-याचा लोकार्पण सोहळा नुकताच थाटात संपन्न झाला लोकार्पण पश्चात पहिल्याच आठवडी बाजारात अनेकांचे मोबाईल चोरी झाल्याची घटना उजेडात आली.शहरातील आठवडी बाजारातून चोरट्यांनी पोलीस यंत्रणेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यास चॅलेंज करत तब्बल आठ ते दहा जणांचे मोबाईल चोरीला गेले असल्याचे नागरिक सांगत आहेत.**

परळी शहरात दर सोमवारी घरणीकर रोड या ठिकाणी भाजीपाल्याचा आठवडी बाजार भरत असतो या रोडवर तसेच शहरात चोरट्यांवर वाचक निर्माण व्हावा कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बीड पोलीस प्रशासनाने परळी शहरात अशा संवेदनशील ठिकाणी अत्याधुनिक असे सीसीटीव्ही यंत्रणा बसवली आहे ही यंत्रणा मोठा गाजावाजा करून कार्यान्वित केली परंतु अवघ्या एका दिवसात चोरट्याने आठवडी बाजारातून आठ ते दहा जणांचे मोबाईल चोरल्याची घटना समोर आली आहे त्यामुळे ही सीसीटीव्हीची यंत्रणा नेमके कोणत्या उद्देशासाठी बसवण्यात आली याबाबत परळीकर साशंक आहेत.

## आपण मंजूर करुन आणलेल्या कामांचे श्रेय लाटण्याचा खोतकरांचा प्रयत्न-आ.गोरंटयाल

**जालना । प्रतिनिधी**

**आपण मंजूर करून आणलेल्या आणि पूर्णत्वाकडे असलेल्या विकास कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांच्याकडुन केला जात असल्याचा आरोप आ.कैलास गोरंटयाल यांनी केला आहे.**



जालना शहरातील अंबड रोडवरील मातोश्री लॉन्स ते राजपूतवाडी या १८ मीटर रस्त्याच्या कामासह भूमिगत गटार योजना, पेव्हर ब्लॉक (५ कोटी ५४ लक्ष) आणि मातोश्री लॉन्स ते जेल रोड कारागृह या १८ मीटर रस्ता रुंदीकरणाच्या कामासाठी आपण राज्य शासनाकडून ४ कोटी ५३ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून आणलेला आहे. महत्वाची बाब म्हणजे या दोन्ही कामांचा शुभारंभ आपल्या हस्ते दि. १० मार्च २०२४ रोजी करण्यात आला होता. उपरोक्त दोन्ही विकासाची कामे पूर्णत्वाकडे आली आहे. राजपूतवाडी या रस्त्यावर असलेल्या एका मालमत्ता धारकाने न्यायालयात याचिका दाखल केल्याने रस्त्याचे थोडे काम शिल्लक असून ही दोन्हीही कामे आपण मंजूर करून आणली असतांना माजी राज्यमंत्र्यांकडून या कामांचे फुकटचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न केला जात आहे. कुंभकर्ण जसा सहा महिने झोप काढत होता आणि सहा महिने जागी राहत होता असाच काहीसा प्रकार खोतकर यांनी चालवला आहे. निवडणुका जवळ आल्या की, माजी राज्यमंत्री जालना शहर आणि मतदार संघात विकास कामांचे नारळ फोडत फिरतात आणि निवडणूक संपताच अनेक महिने जालन्यातून गायब होतात. आपण किती विकास केला याचा आव आणण्याचा प्रयत्न करतात. मात्र, त्यातील किती विकास काम मार्गी लागतात हे सर्वानाच माहीत असल्याची टीका आ. कैलास गोरंटयाल यांनी केली. मातोश्री लॉन्स ते राजपूतवाडी आणि मातोश्री लॉन्स ते जेलरोड या दोन्ही रस्त्यांच्या कामांचा शुभारंभ आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते दि. १० मार्च २०२४ रोजी करण्यात आला होता. यावेळी मनपाचे उपअभियंता (बां) सय्यद सऊद यांचीही उपस्थिती होती.

## शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी सतीश घाटगे बँकेत

**जालना । प्रतिनिधी**

तालुक्यात पिक कर्जासाठी बँका शेतकऱ्यांची अडवणूक होत करत असल्याच्या तक्रारी वाढत आहे. भाजपा नेते सतीश घाटगे यांच्याकडे काही शेतकऱ्यानी तक्रारी केल्या होत्या. या शेतकऱ्यांच्या पिक कर्जासाठी सतीश घाटगे यांनी थेट बँकेत जाऊन शाखा व्यवस्थापकांना जाब विचारला. शेतकरी बांधवांना तात्काळ पिक कर्ज देण्याच्या सूचना सतीश घाटगे यांनी सोमवारी केल्या.



सतीश घाटगे यांनी सोमवारी शेतकऱ्यांना सोबत घेऊन घनसावंगी येथील बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेत भेट दिली. शाखा व्यवस्थापक खुशाल शेंगणे यांच्याशी शेतकऱ्यांच्या पिक कर्ज प्रस्तावाबाबत माहिती घेतली. एकरुखा येथील शेतकरी बांधवांना तात्काळ उपलब्ध करून देण्याची विनंती त्यांनी केली. तसेच पिक कर्जासाठी एकाही शेतकऱ्याची अडवणूक होणार नाही याची खबरदारी घेण्याचीही विनंती त्यांनी केली. यावेळी विष्णुपंत जाधव, प्रभाकर धांडे, बाबासाहेब हरबक, अर्षद पटेल, राजेंद्र छल्लारे, पंकज रक्ताटे, भरत सपाटे, भास्कर खाडे, कन्हैयालाल कायस्थ, भागवत खाडे, बद्रीनाथ खाडे, दत्ता खेडकर, शंकरराव जाधव, उद्धव खाडे, धनुलाल कायस्थ, सुभाष कायस्थ, कैलास मदनुरे, शिवाजी मदनुरे, डिगांबर जोशी, बाळू खाडे, उद्धव खाडे, सुनील खाडे, रामदास पोटे, दत्ता नखाते, वसंत पवार, प्रल्हाद खेडकर,प्रकाश खाडे,संतोष खाडे,दिलीप खाडे,महादेव मदनुरे,राहुल पोटे, दीपक पोटे ,नंदू खाडे, मधुकर जाधव, अंशीराम ठुले,अं कुश खाडे व शेतकरी उपस्थित होते.

## जायकवाडी-ब्रम्हगव्हाण जलसिंचन योजनेची शेतकऱ्यांकडून पाहणी

**अंबड । प्रतिनिधी**

जायकवाडी पैठण धरण पाणी मागणी संघर्ष समितीच्या शेतकरी अभ्यास गटाने जायकवाडी ते ब्रम्हगव्हाण दरम्यान योजनेची (दि.२० जुलै रोजी) पाहणी करुन स्थानिक शेतकरी वर्गाची भेट घेतली.यावेळी योजनेसाठी नियमितपणे पाठपुरावा करुन सरकार दरबारी पैठण तालुक्यातील संबंधित गावांचा पाणीप्रश्न पटवून देण्यात आला या वीस वर्षाच्या अविरत संघर्षानंतर योजना मंजूर होवून खेर्डा तलावात योजनेचे पाणी आल्याचे सोपान भालेकर,रामचंद्र भालेकर, पवन इंगळे,सोमनाथ भालेकर, कैलास तांबे गणेश मुळे या आंदोलक शेतकऱ्यांनी सांगीतले.समिती अध्यक्ष अँड.शामसुंदर पाटील,चंद्रशेखर मोहरीर,रविंद्र गोल्डे,शिवप्रसाद चांगले,बालासाहेब



इंगळे,हनुमान धांडे,राजीव डोंगरे अण्णासाहेब पैठणे,दिनेश काकडे,कल्याण तारडे, सरपंच जगन दुर्गे,रामभाऊ लांडे, प्रकाश नारायणकर,कुमार रुपवते, प्रसाद झाडे,सरपंच अँड.रामेश्वर गायके,बंडु पागीरे,अमोल डोईफोडे,सुनील पिठोरे,सरपंच अँड.रतन तारडे,गोवर्धन भोरे,सिध्दार्थ रोटे,अय्युब बागवान, अँड.मनोज तारडे,ओम काकडे,गणेश वाडेकर,चंद्रकांत कारके,रावसाहेब पवार,अमोल आढावे,रवी राठोड, शिवाजी कराड,भानुदास काळे,बाळासाहेब नारळे,हरिश्चंद्र अर्मुळे,बप्पासाहेब टकले,बापुसाहेब पठाडे,पवन गिल्डा,बाबासाहेब सिनगारे,बाबासाहेब खांडेभराड, काकासाहेब गोडसे,बद्रीनाथ जंगले,पदमाकर कायंदे,राम शेळके,सुनील गोल्टे,रमेश गोरे, प्रशांत पैठणे, प्रकाश डेरे,सुभाष हिवराळे मोहन मुंडे, प्रकाश दौंड यांच्या सह शेतकरी,सरपंच,सोसायटी चेअरमन,विविज्ञ,पत्रकार,अभियंता,व्यापारी आदीचा अभ्यास दौ-यात सहभाग होता.अंबड तालुक्यातील अवर्षण प्रवण भागात सुलभतेने जायकवाडीचे पाणी आणण्यासाठी संघर्ष समितीकडून जनजागृती करिता पहिला टप्पा म्हणून विविध जल प्रकल्पांचा अभ्यास केला जात असून भविष्यात होणाऱ्या आंदोलनासाठी अभ्यास दौ-याचा उपयोग होवू शकतो तसेच पैठण येथील जायकवाडी ब्रम्हगव्हाण जलसिंचन उपसा योजना स्थानिक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत असुन या योजनेतून अंबड शहर, रोहिलागड,जामखेड,पारनेर,ताडहादगाव सर्कल मधील गावांना मिळु शकते असे अँड शामसुंदर पाटील यांनी शेवटी म्हटले.

## परळी शहरात वाहतुकीची कोंडी नित्याचीच

### आठवडी बाजारात पायी चालणे बनले कठीण

**परळी। प्रतिनिधी**

**परळी शहरात सर्वच मुख्य रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे .यामुळे व्यापाऱ्यांसह नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नुकतेच परळी शहर पोलीस प्रशासनाकडून विविध ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. परंतु या सीसीटीव्ही चा वापर मात्र पोलिसांकडून होत नसल्याचे दिसत आहे.**




परळी शहरात नगर परिषदेच्या माध्यमातून भर पावसाळ्यामध्ये नाल्या आणि रस्ते यांची कामे होत आहेत. या कामासाठी अनेक ठिकाणच्या बाजारपेठेतील नाल्या व रस्ते खोदून ठेवले आहेत. त्यातच रस्त्यावर बसणाऱ्या भाजीपाला विक्रेते ,फळांचे गाडेवाले, यांच्यामुळे रहदारीला प्रचंड अडथळे निर्माण होत आहेत. घरणीकर रोड, राणी लक्ष्मीबाई टावर रोड, स्टेशन रोड ,वैजनाथ मंदिर कडे जाणारा रोड अशा प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीची कोंडी होत आहे .वाहतुकीची होत असलेली कोंडी ही सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून पोलीस ठाण्यातील स्क्रीनवर पाहायला मिळते. बसल्या ठिकाणावरून पोलीस त्या ठिकाणच्या ध्वनी क्षेपकावर सूचना करू शकतात. परंतु पोलिसांकडून कुठलीही सूचना देण्यात येत नाही किंवा वाहतूक पोलीस अशा ठिकाणी येऊन कारवाई करताना पाहायला मिळत नाही.

# शेतकरी संघटनांचा हरियाणा सरकारला १५ ऑगस्टपर्यंतचा अल्टिमेटम

## शंभू सीमेवरून पंढेर यांचा हल्लाबोल

चंदिगढ : पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने शंभू सीमा उघडण्याचे आदेश दिले आहे. शंभू आणि खनौरी सीमेवर आंदोलन करणाऱ्या शेतकरी संघटना दिल्ली चलो मोर्चाच्या तयारीला लागल्या आहेत. तर विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर शेतकरी आंदोलनामुळे हरियाणा सरकारच्या अडचणी वाढू लागल्या आहेत. त्यामुळेच हरियाणा सरकारकडून प्रधान सचिव राजेश खुल्लर यांनी चंदीगडमध्ये शेतकरी संघटनांशी रविवारी (ता.२१) चर्चा केली. तर या बैठकीत शंभू सीमा उघडण्याबरोबरच शेतकरी संघटनांच्या मागण्यांबाबच चर्चा झाल्याची माहिती आहे. मात्र याच बैठकीवरून शेतकरी नेते सर्वनसिंह पंढेर यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शेतकरी संघटनांनी हरियाणा सरकारला १५ ऑगस्टपर्यंतचा अल्टिमेटम देताना सर्व मागण्या मान्य करण्याचे आवाहन केले आहे.

पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाने शंभू सीमा उघडण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यानंतरही शंभू सीमा उघडण्यात आलेली नाही. येथील बॅरिगेटींग न काढता हरियाणा सरकाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याचदरम्यान हरियाणा सरकारने शेतकरी नेत्यांना चर्चेसाठी चंदीगडला बोलवून हरियाणा सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आणि मागण्यांवर सकारात्मक असल्याचा आव आणत आहे. रविवारी प्रधान सचिव खुल्लर यांनी बोलावलेल्या बैठकीत शंभू सीमा खुली करण्याबाबत आणि दिल्लीकडे कूच करण्याबाबत कोणतीही चर्चा झाली नाही. तर प्रामुख्याने



हरियाणातील शेतकऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक मागणीवर शेतकरी व अधिकाऱ्यांनी आपली बाजू मांडली. प्रलंबित वीज जोडणी, कर्जमाफी, एमएसपी यासह अनेक मुद्द्यांवर बैठकीत चर्चा झाली. तर यावेळी हरियाणाचा युनायटेड किसान मोर्चा च्या काही मागण्या सरकारने मान्य केल्या. मात्र अनेक मागण्यांवर तोडगा काढताना त्यात सुधारणा करण्याचे आश्वासन सरकाकडून प्रधान सचिव खुल्लर यांनी दिले. तर इतर मागण्या पूर्ण करण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंतचा अल्टिमेटम शेतकरी संघटनांनी दिला आहे. या कालावधीत मागण्या पूर्ण न झाल्यास शेतकरी पुढील रणनीती आखतील. तर आंदोलन तीव्र केले जाईल असा इशारा दिला आहे. यादरम्यान शेतकऱ्यांच्या मागण्यांवर मुख्यमंत्री नायब सैनी मागण्यांबाबत बैठक घेण्याची शक्यता असून तेच अंतिम निर्णय घेतील, असे म्हटले जात आहे. हरियाणा सरकारने बोलावलेल्या बैठकीवरून शेतकरी नेते सरवनसिंग पंढेर यांनी निशाना साधताना टीका केली आहे. तसेच सरकारने बैठकीसाठी बोलावताना शंभू सीमा उघडण्यावर चर्चा करणार होती. मात्र या बैठकीत तशी कोणतीच चर्चा झाली नाही. मग सरकराच्या बैठकीचा मुद्दा अफवा होती का असा सवाल देखील पंढेर यांनी उपस्थित केला आहे. यावेळी शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी राज्यातील पोलिसांच्या पुरस्कारावरून जोरदार आक्षेप घेतला. तसेच हा पुरस्कार फक्त शेतकऱ्यांना दिल्लीकडे जाण्यापासून रोखल्यावरून दिला जात असल्याचा आरोप केला. तर शेतकरी आंदोलनादरम्यान याच अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर लाठ्या-गोळ्या झाडल्या. जर अशा मारणाऱ्यांचा सन्मान होऊ लागला, तर सरकारच हिंसाचाराला प्रोत्साहन देत असल्याचे सिद्ध होत असल्याचे शेतकरी नेत्यांचे म्हणणे आहे. तर सरकारची अशी कृती शेतकरी खपवून घेणार नाही असा इशारा ही शेतकरी नेत्यांनी यावेळी दिला.

### या संघटना आणि नेत्यांचा सहभाग

सरकारने चर्चेसाठी आमंत्रित केलेल्या संघटनांमध्ये किसान सभा हरियाणा, भारतीय किसान युनियन (बीकेयू, टिकैत) भारतीय किसान युनियन (नैन), भारतीय किसान युनियन (एकता उग्रह), भारतीय किसान युनियन मांगे राम, पगडी संभल जट्टा, भारतीय किसान मजदूर युनियन (कौठा), हरियाणा किसान सभा यांचा समावेश आहे. तसेच भारतीय किसान संघर्ष समिती, महिला किसान महासभा, राष्ट्रीय किसान मंच, क्रांतिकारी किसान युनियन यांचा सहभाग.

# शेतकरी बांधवांसाठी अन्न व पोषण सुरक्षा कडधान्य योजना

## शेतकऱ्यांना १० लाखांपर्यंत अनुदान



शेतकरी बांधवांसाठी ही योजना बीज प्रक्रियेशी जोडलेली असून त्यातून दहा लाख रूपयांपर्यंत अनुदान मिळू शकते. या योजनेसाठी नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी किंवा संघ इ. पात्र ठरतील. लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी, संघ यांनी तालुका कृषी कार्यालयाने अर्जाला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रीयीकृत बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर संबंधित शेतकरी, उत्पादक कंपनी, संघ अनुदानाच्या लाभास पात्र राहील.

ही आहे पात्रता : लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी, संघ यांनी अर्ज करताना ज्या कार्य क्षेत्रात कंपनी आहे, त्याच कार्यालयात अर्ज सादर करावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादन कंपनी, नोंदणी प्रमाणपत्र, कमिटी ठराव, मागील तीन वर्षांची बॅलेन्स शीट अथवा ऑडिट रिपोर्ट, ज्या जागेवर बीज प्रक्रिया उद्योग सुरू करायचा आहे, त्याचा मालकी हक्क पुरावा इत्यादी कागदपत्रे अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

अन्न व पोषण सुरक्षा कडधान्य योजना काय आहे? अन्न व पोषण सुरक्षा कडधान्य योजना बीज प्रक्रिया संच उभारणीस प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा १० लाख रुपये यांपैकी जे कमी असेल तेवढे अनुदान दिले जाणार आहे. या योजनेसाठी नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी किंवा संघ पात्र असेल. यासाठी प्रथम तालुका कृषी विभाग त्यानंतर बँकेकडे अर्ज सादर करावा लागणार आहे.

अर्ज करण्याची ३१ तारखेची मुदत : शेतकरी उत्पादक कंपनी, संघ हे ३१ जुलै २०२४ अखेर कार्य क्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करू शकतील. निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागदपत्रांच्या छाननीनंतर पूर्व संमती देण्यात येईल. नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी, संघ यांनी त्यांच्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत दिलेल्या मुदतीत अर्ज करावेत. ज्या आर्थिक वर्षात पूर्व संमती देण्यात आली आहे त्यांचे आर्थिक वर्षात बीज प्रक्रिया संच प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# हुरड्यासाठी ज्वारीच्या या वाणांची करा लागवड

हिरव्या दाण्याचा हुरडा अतिशय स्वादिष्ट लागतो, कारण त्यावेळेस या दाण्यामध्ये मुक्त अमिनो आम्ल, साखर, विद्राव्य प्रथिने, जीवनसत्वे यांचे प्रमाण अधिक असून पिष्टमय पदार्थांचे प्रमाण कमी असते. खास हुरडा पार्टी साठी गोडसर रसाळ आणि भरपूर दाणे असणाऱ्या जाती राज्यातील कृषि विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत.

हुरड्यासाठी ज्वारीच्या वाणांची नावे : खरीप लागवडीसाठी वाण - पीडीकेव्ही कार्तिकी (वाणी १०३), पीकेव्ही अश्विनी (वाणी ११/६).

रब्बी लागवडीसाठी वाण - फुले मधुर, एसजीएस ८-४, परभणी वसंत, ट्रॉम्बे अकोला सुरुची.

स्थानिक वाण : सुरती, गूळभेंडी, कुची कुची, काळी दगडी, वाणी, मालदांडी.

हुरड्याच्या वाणांची सविस्तर माहिती : १) एसजीएस-८-४ : वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसित केलेला वाण. हुरडा रुचकर आणि गोड. हुरड्याची प्रत उत्तम, कणसातील दाणे सहजरीत्या वेगळे होतात. इतर हुरड्याच्या जातीपेक्षा याचा दाणा टपोरा. हुरडा उत्पादन १५ -१६ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ७०-७५ क्विंटल प्रति हेक्टरी. २) फुले उत्तरा : स्थानिक जातीतून निवड पद्धतीने विकसित. हुरड्याची अवस्था येण्यास ९०-१०० दिवस. भोंडातून दाणे सहज बाहेर पडतात. सरासरी ७०-९० ग्रॅम इतका हुरडा मिळतो. हुरडा चवीस सरस अत्यंत गोड. ताटे गोड असल्याने जनावरे कडबा चवीने खातात. कणीस गोलाकार, मध्यम घट्ट मध्यम उंचीचा, पाने पालेदार, खोड मध्यम, गोड रसरशीत. खोडमाशी व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम. हुरडा उत्पादन २०-२५ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन ५५-६० क्विंटल प्रति हेक्टरी. ३) फुले मधुर (आर एस एस जी व्ही -४६) : उत्कृष्ट प्रतीचा व चवदार हुरडा. खोड मध्यम, गोड, रसरशीत. वाण उंच व पालेदार जात. हुरडा अवस्था येण्यास ९३ ते ९८ दिवस लागतात. हुरडा अवस्थेत दाणे सहज सुटण्याचे प्रमाण हे ९५ टक्के पेक्षा जास्त. खोडमाशी किडीस, खडखड्या रोगास प्रतिकारक. अवर्षणास प्रतिकारक. हुरड्याचे उत्पादन ३०-३५ क्विं./हे. कडब्याचे उत्पादन



६५-७० क्विं./ हेक्टर. ४) सुरती : चवीला अत्यंत गोड, त्यामुळे मागणी चांगली. दाण्याचा आकार गोल. कणसांचा आकार थोडा वाकडा. या ज्वारीचे एकरी ५-७ क्विंटल उत्पादन निघते. शिवाय ६० क्विंटल पर्यंत हिरवा कडबा सुद्धा होतो. हा हुरडा ९० ते १०० दिवसांनी काढणीस येतो. ५) परभणी वसंत (पीव्हीआरएसजी १०१) : खाण्यास चवदार, गोड, मऊ. कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात. हुरड्याची अवस्था येण्यास ९५ दिवस. खोडमाशी, खोड कीड व खडखड्या रोगास सहनशील. दाण्याची आणि कडब्याची प्रत उत्तम. हुरडा उत्पादन ३४ क्विंटल प्रति हेक्टरी. कडब्याचे उत्पादन १३३-१३५ क्विंटल प्रति हेक्टरी. मराठवाडा विभागासाठी शिफारस. ६) ट्रॉम्बे अकोला सुरुची (टी ए के पी एस -५) : मळणीस अतिशय सुलभ. हुरड्याची प्रत उत्तम, चवदार. हुरडा तयार होण्याचा कालावधी ९१ दिवस. हुरड्याचे उत्पादन ४३ क्विंटल. हिरवा चारा उत्पादन ११० क्विंटल. महाराष्ट्रासाठी प्रसारित. ७) पी डी के व्ही कार्तिकी (वाणी १०३) : हुरडा चवदार आणि गोड हुरडा ८२ ते ८४ दिवसात तयार होतो. मीज माशीच्या प्रादुर्भावाला बळी पडत नाही. हुरडा उत्पादन ४२ ते ४३ क्विंटल प्रति हेक्टर. विदर्भासाठी प्रसारित. ८) के व्ही अश्विनी ( वाणी ११/६) : ८२ ते ८४ दिवसात हुरडा तयार : हुरडा मळणीस सुलभ. हुरडा अधिक गोड व चवदार. दाण्यात साखरेचे प्रमाण अधिक. मीज माशी प्रतिकारक. हुरडा उत्पादन ४२-४३ क्विंटल प्रति हेक्टरी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४० : कॅनडाचे प्रांत एकतीकरण कायद्याने तयार केले गेले.
१९०३ : फोर्ड मोटर कंपनीने पहिली कार विकली.
१९२७ : मुंबईत 'रेडिओ क्लब' ने पहिले रेडिओ प्रसारण सुरू केले. यात इंग्रजी भाषेतुन बातम्या देण्यात आल्या. याचेच पुढे 'आकाशवाणी' मधे रुपांतर झाले.
१९२९ : इटलीतील फासिस्ट सरकारने परकीय शब्दांच्या वापरावर बंदी घातली.
१९४२ : ज्यूंचेशिरकाण ञेब्लिंका छळछावणी उघडण्यात आली.
१९८२ : 'इंटरनॅशनल व्हेलिंग कमिशन' ने व्हेल माशांच्या व्यापारी पद्धतीच्या मासेमारीवर १९८५-८६ पर्यंत बंदी घालण्याचा निर्णय घेतला.
१९८३ : एल.टी.टी.ई. ने श्रीलंकेच्या १३ सैनिकांची हत्या केली. याचा वचपा म्हणून श्रीलंकेच्या सरकारने तमिळवंशीय नागरिकांवर हल्ला केला. जुलै महिन्यात १,००० नागरिक ठार. १,००,००० नागरिकांनी भारत, युरोप आणि कॅनडात पलायन केले. येथून श्रीलंकेच्या नागरी युद्धाला सुरुवात झाली.
१९८३ : मॉंट्रिअलहुन एडमंटनला जाणाऱ्या एअर कॅनडा फ्लाइट १४३ या बोईंग ७६७ २३३ विमानातील इंधन अचानक संपले. वैमानिकांनी अतिकुशलतेने विमान तसेच झेपावत गिमली, मॅनिटोबा येथे उतरवले. (या घटनेची चित्रफित पाहण्यासाठी येथे क्लिक करा.)
१९८६ : जैवअभियांत्रिकी तंत्रज्ञान वापरुन जगात सर्वप्रथम तयार केलेल्या 'हेपेटायटिस-बी' या रोगावरील लशीच्या वापरास अमेरिकेत परवानगी मिळाली.
१९९५ : दोन अमेरिकन खगोलशास्त्रज्ञांनी हेल-बॉप धूमकेतूचा शोध लावला.
१९९९ : केनेडी अवकाश केंद्रावरुन कोलंबिया यानाचे यशस्वी उड्डाण. या यानातील अंतराळवीरांनी 'चंद्रा' ही अवकाशातील सर्वात मोठी दुर्बिण प्रक्षेपित केली.
२००१ : इंडोनेशियाच्या राष्ट्राध्यक्ष पदी मेघावती सुकर्णोपुत्री यांची नियुक्ती करण्यत आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : लोकमान्य बाळ (केशव) गंगाधर टिळक समाजसुधारक आणि प्रखर राष्ट्रवादी, भगव्?दगीतेचे भाष्यकार (मृत्यू: १ ऑगस्ट १९२० मुंबई)
१८६४ : अपोलिनारियो माबिनी, फिलिपाईन्सचा पहिला पंतप्रधान.
१८८५ : युलिसीस एस. ग्रॅन्ट अमेरिकेचे १८ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २७ एप्रिल १८२२)
१८८६ : वॉल्टर शॉटकी जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ मार्च १९७६)
१८९८ : ज्ञानपीठ पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध बंगाली भाषिक कादंबरीकार व लेखक ताराशंकर बंद्योपाध्याय यांचा जन्मदिन.
१८९९ : पश्चिम जर्मनीचे ३रे राष्ट्राध्यक्ष गुस्ताफ हाइनिमान यांचा जन्म.
१९०६ : चंद्रशेखर आझाद स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीचे क्रांतिकारक (मृत्यू: २७ फेब्रुवारी १९३१)
१९१७ : लक्ष्मीबाई यशवंत तथा ' माई' भिडे नाट्य-चित्रपट अभिनेत्री (मृत्यू:)
१९२५ : बांगलादेश चे पहिले पंतप्रधान ताजुद्दीन अहमद यांचा जन्म. (मृत्यू: ३ नोव्हेंबर १९७५)
१९२७ : धोंडुताई कुलकर्णी जयपूर-अत्रौली घराण्याच्या गायिका

१९४७ : डॉ. मोहन आगाशे अभिनेते व मानसोपचारतज्ञ
१९५३ : इंग्लिश क्रिकेट खेळाडू ग्रॅहम गूच यांचा जन्म.
१९६१ : भारतीय अभिनेते मिलिंद गुणाजी यांचा जन्म.
१९७३ : भारतीय गायक-गीतकार, निर्माता, अभिनेता आणि दिग्दर्शक हिमेश रेशमिया यांचा जन्म.
१९७५ : तमिळ अभिनेता सूर्य शिवकुमार यांचा जन्म.
१९७६ : ज्यूडीथ पोल्गार हंगेरीची बुद्धीबळपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८५ : युलिसिस ग्रांट अमेरिकेचे १८ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २७ एप्रिल १८२२)
१९९३ : छत्तीसगड राज्यातील भारतीय स्वातंत्र्यसेनानी लक्ष्मण प्रसाद दुबे यांचे निधन.
१९९७ : वसुंधरा पंडित गायिका (जन्म:)
१९९९ : दामोदर तात्याबा तथा दादासाहेब रुपवते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी आणि आंबेडकरी चळवळीचे नेते (जन्म: २८ फेब्रुवारी १९२५ अकोले, अहमदनगर)
२००४ : महमूद विनोदी अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता (जन्म: २९ सप्टेंबर १९३२)
२०१२ : लक्ष्मी सहगल आझाद हिंद सेनेतील झाशी राणी रेजिमेंटच्या कॅप्टन (जन्म: २४ आक्टोबर १९१४)
२०१६ : पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री, कालिदास सन्मान पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय चित्रकार एस. एच. रजा यांचा यांचे निधन.

# सोयाबीन पिकावरील रोगाचे व्यवस्थापन

सद्या ढगाळ वातावरणामुळे जमिनीतून अन्नद्रव्य घेता न आल्याने सोयाबीनची रोपे पिवळे-पांढरे पडत आहे. लोह या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे सोयाबीनच्या झाडामध्ये क्लोरोसिसची लक्षणे निर्माण होतात. क्लोरासीस ही जमिनीत लोहाच्या कमतरतेमुळे होत नाही. तर काही कारणाने झाडांद्वारा लोह शोषण न केल्याने होते.

कशी ओळखावी लक्षणे : लोह या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. हरितद्रव्याच्या अभावामुळे पानांच्या शिरांमधील भाग पिवळा पडतो व शिरा फक्त हिरव्या दिसतात. सोयाबीनचे प्रथम ट्रायफोलिएट पाने हिरवी राहतात कारण लोह हे अन्न द्रव्य वाहू न शकणारे आहे. लोह रोपट्यात स्थिर होऊन साठविले जाते. त्यामुळे, नवीन पानांमध्ये लक्षणे दर्शविली जातात. पाने पिवळी पडल्याने हरितद्रव्य कमी होऊन प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते व वाढ खुंटते आणि उत्पादनही कमी येते.

काय आहेत कारणे : लोहाची कमतरता विशेष म्हणजे कमी प्रमाणात निचरा होणाऱ्या चुनखडी युक्त जमिनीत होते. वनस्पतींमध्ये हिरवे रंगद्रव्य-क्लोरोफिल तयार करण्यासाठी लोह (फेरस) आवश्यक असते. बहुतेक जमिनीमध्ये वनस्पतींच्या आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात लोह हे सूक्ष्म अन्न द्रव्य असते. जमिनीचा सामू (पीएच) ७.५ पेक्षा जास्त असतो त्या जमिनीतील लोह या उपलब्ध स्थितीत न राहता फेरीक स्वरूपात जातो व तो पिकांना शोषून घेता येत नाही त्यामुळे पिकावर लोहाची कमतरता दिसते. तसेच जमिनीत मुळांना ऑक्सिजन पुरवठा कमी झाल्याने देखील मुळाद्वारे लोह कमी शोषला जाऊन क्लोरासीस होतो.

असे करा व्यवस्थापन : शेतात वाफसा स्थिती निर्माण होण्यासाठी अतिरिक्त पाणी साचलेले असेल ते काढण्याची सोय करावी. वाफसा आल्यानंतर पीक ३०-३५ दिवसांचे होण्यापूर्वी एक कोळपणी करावीच. ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली, खत १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास ८-१० दिवसांनी पुन्हा एकदा फवारणी करावी. पाण्याचा ताण पडल्यास ठिबक च्या साह्याने संरक्षित पाणी द्यावे.

सिंचन सुविधा उपलब्ध नसल्यास (पोटॅशियम नायट्रेट) या विद्राव्य खताच्या १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आवश्यकतेनुसार ८ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.



# गायरानसाठी करचुंडीच्या ग्रामस्थांचे जिल्हाधिकारी कार्यालयसमोर धरणे

बीड । प्रतिनिधी

करचुंडी समस्त गावकरी बहुजन बांधव यांचे वतीने करचुंडी गावाला असणारी गायरान जमिनीचे कायदेशीर अधिकार म्हणजे, गावरात जमिन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावाने करणे, ७/१२ उताऱ्यावर त्याची नोंद करणे इत्यादी मागणी करीता ते बीड जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमिनीचा वापर करुन त्यावर अनेक प्रकारचे पीके घेवून आपले कुंटूंबाचे पालनपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांना या मागणीचा लाभ घेणे करीता दि. २० जुलै पासून ते मागणी मान्य झालेचे लेखी पत्र संबंधित अधिकाऱ्याचे सहीचे मिळेपर्यंत करचुंडी गावातील गरीब दास महाराज सभागृह येथे बेमुदत धरणे आंदोलन जिल्हा अधिकारी कार्यालय समोर सुरू मौजे करचुंडी येथील जमीन नसलेल्या शेतकऱ्यांनी गावालगत असणारी (गायरान) जमीनीवर विविध प्रकारची नगदी पिके घेवून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर या गावचे शेतकरी आपले कुंटूंबाचे उदरनिर्वाह पालनपोषण करीत आहे. या गावातील शेतकऱ्यांना शासनाच्या मिळणाऱ्या अनेक सरकारी सुख सुविधा मिळत




नाहीत. या गावातील बरेचसे शेतकरी अल्पभुधारक आहेत.

आम्ही समस्त गावकरी करचुंडी येथील गायरान जमीन शेतकऱ्यांच्या नावावर होवून त्या जमिनीचा त्याला ७/१२ उतारा देणेकामी शासन स्तरावर व राजकीय स्तरावर वेगवेगळे पत्रव्यवहार केलेले आहेत. गायरान जमिनीचे कायदेशीर हक्क नसलेमुळे शेतकऱ्यांना शेतीला पुरक दुसरे जोडधंदे नाहीत. ना जमिनीत वीज घेता येते ना शेतकऱ्यांना सोलर पंप दिले जातात. तरी शेतकऱ्यांना अनुदान व पीकविमा योजना देवून या सर्व अडचणीतून बीड जिल्हयातील शेतकरी मुक्त झाला पाहिजे. तो प्रगतीशील शेतकरी झाला पाहिजे. हीच मागणी घेवून समस्त गाव मौजे करचुंडी ता. जि. बीड येथील गरीब दास महाराज सभागृह येथे दि. २०/०७/२०२४ रोजीपासून शेकडो शेतकरी समूहाच्या उपस्थितीमध्ये सकाळी १०.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत आंदोलन सुरु राहणार आहे. सदरचे रॅली आंदोलन हे करचुंडी ते बीड पायी रैली दि. २२/०७/२०२४ रोजी सकाळी ९.०० ते सायं. ५.०० या वेळेत जिल्हयातील खेडयापाडयातील गायरान जमीन वापर करणाऱ्या शेतकऱ्यांकरीता असणार आहे. सदरचे आंदोलन हे पुर्णपणे शांततेत व लोकशाही मार्गाने होणार. प्रशासकीय यंत्रणेला कुठलाही त्रास होणार नाही याची आंदोलन शिष्टमंडळाच्या वतीने दक्षता घेतली आहे. आंदोलनामध्ये छोटेखानी भीमगीत गायनाचा व्याख्यान, प्रबोधन इत्यादी तसेच संविधान जनजागृती इत्यादी विषयावर चर्चा होणार आहे. तरी बेमुदत धरणे आंदोलनाला गालबोट लागू नये. सामाजिक शांततेचा भंग होऊ नये करीता आंदोलनाला कुठलेही अडचण येऊ नये करीता पोलीस परवानगी स्पिकर परवाना व पोलीस संरक्षण करीता मागणी करीत आहोत. आंदोलनातील मुख्य मागणी मान्य होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्याच सहीचे मागणी मान्य झालेचे पत्र मिळेपर्यंत हे आंदोलन सुरु राहणा बेमुदत धरणे आंदोलनातून मागणी मान्य न झालेस पुढे आंदोलनाची दिशा बद आंदोलन ऐवजी प्रेमनाथ अमर उपोषणाला सुरुवात केली आहे.

# चोर आल्याच्या कांगाव्याने जातीय दंगली होण्याची शक्यता!

## पोलिस प्रशासनाने प्रसिद्धी माध्यमातून आकडेवारी जाहीर करावी – इलयास

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून बीड शहरात चोर आल्याच्या कांगाव्याने मध्यरात्री आरडाओरड करून धिंगाणा घालण्याचे काम काही अतिउत्साही तरुण मुख्य रस्त्यांपासून गल्लीबोळात करत आहेत. यामुळे जातीय दंगली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे पोलिसांनी खरी वस्तुस्थिती दाखविण्याकरिता शहरात असलेल्या प्रत्येक पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या चोरीच्या घटनांची आकडेवारी प्रसिद्धी माध्यमातून द्यावी. जेणेकरून मध्यरात्रीच्या धिंगाण्याला आवर घालता येईल. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सय्यद इलयास यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

चोर आले,चोर आले म्हणत शहरातील अनेक भागात तरुण आणि वयस्कर पुरुष रात्री गस्त घालण्याच्या नावाखाली आरडाओरड करत फिरणे, मोटरसायकली जोरजोरात रेस करून चालविणे असे प्रकार करीत आहेत. यामुळे शहरात राहणाऱ्या नागरिकांना रात्रीची चांगली झोप घेणे अवघड झाले आहे. शिवाय गस्त घालणारे तरुण हातात दांडके, कुऱ्हाळ्या वगैरे घेऊन फिरत आहेत तसेच कुणी अनोळखी दिसल्यास त्याला काही एक न विचारता बदडून ही काढत आहेत. अशा घटना आतापर्यंत अनेकदा घडल्या आहेत. अशा घटनांना काही पोलिस अधिकाऱ्यांनी व्हिडिओ रेकॉर्ड करून सोशल मीडिया वरून व्हायरल केल्याने खत पाणी मिळाल्यासारखे झाले आहे. शिवाय गल्लीबोळापासून मुख्य रस्त्यांवर सुरू असलेल्या मध्यरात्रीच्या या धिंगाण्याला आणीबाणी प्रसंगी साथ मिळावी म्हणून अनेक लोक आपापल्या घरात दगड, गोटे, मिरचीचे पाणी ठेवत आहेत. ज्याचा वापर कथित चोर आल्यास ऐनवेळी करता यावा हा उद्देश यामागे आहे. या सर्व प्रकारात रात्रीच्या वेळी जर चुकून दुसऱ्या समाजातील व्यक्ती किंवा तरुणाला बदडून काढले गेले तर जातीय दंगली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अगोदरच कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड येथील गजापूर मध्ये मशिदीवर उग्रवाद्यांनी केलेल्या हल्ल्यामुळे वातावरण दूषित झालेले आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने शहरात असलेल्या बीड शहर पोलीस ठाणे, शिवाजीनगर पोलीस ठाणे, पेठ बीड पोलीस ठाणे, ग्रामीण पोलीस ठाणे आदी सर्व पोलीस ठाण्यात चोरीच्या घटनांची नोंद झालेली आकडेवारी प्रसिद्धी माध्यमातून जाहीर करावी जेणेकरून चोर आल्याच्या कांगाव्याला आळा बसेल. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते सय्यद इलयास यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# ॲड.नरसिंह जाधव आष्टी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदारसंघांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष यांच्या इच्छुक उमेदवारांचे दौरे सुरू सुरू असून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून नवीन उमेदवारामधून राष्ट्रवादी काँग्रेस विधी सेलचे उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य व मराठवाडा प्रमुख ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव हे निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याने त्यांनी आष्टी, शिरूर आणि पाटोदा तालुक्यात संपर्क दौरा सुरू असून त्यांना जनतेत उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गावोगावी जनतेतीन त्यांच्या उमेदवारीचे स्वागत करण्यात येत आहे.

धिरडी ग्रामपंचायत येथे राम खाडे व ॲड.नरसिंह जाधव यांनी सदरील दौऱ्याची सुरुवात केली असता शरदचंद्रजी पवार पक्षाकडून आष्टी मतदारसंघांमध्ये जो उमेदवार देतील तो उमेदवार निवडून आणण्यासाठी ते प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच आष्टी मतदार संघाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी भय, भ्रष्टाचार, गुंडगिरी मुक्त करण्यासाठी नवीन चेहऱ्याला संधी दिल्यास आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेचा शरदचंद्रजी पवार व जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चित विकास झाल्याशिवाय राहणार नाही व पक्षाच्या वतीने जो उमेदवार दिला जाईल त्याला निवडून आणण्यासाठी आम्ही सर्व मिळून प्रयत्न करू असे ऍड. जाधव यांनी सांगितले. बीड जिल्ह्यातील जिजाऊ मल्टीस्टेट को–ऑप बँक व ज्ञानराधा मल्टीस्टेट को–ऑप क्रेडीट सोसायटी लि. बँकेच्या ठेवीदारांना न्यायालय मार्फत कायदेशीर दिलासा देण्याचा प्रयत्न करू असे सांगितले. बीड जिल्ह्यातील मंदिर मश्जीद इनाम जमिनी ज्या देवस्थानाच्या मालकीच्या आहेत त्या जमिनी बळकावणाऱ्या लोकांपासून सदरील जमिनी न्यायालयीन लढा लढून व शासनाकडे पाठपुरावा करून त्या परत मंदिर मश्जीद यांना मिळविण्यासाठी प्रयत्न करू असेही ऍड. जाधव सांगितले.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्ष स्थानी जेष्ठ नागरिक गंगा आजबे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा येथील ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव, महिला आघाडी तालुकाध्यक्ष तांबे मॅडम, सरपंच दादा करडुले, अजित गिहे, बबन पवार, दीपक खिळे, हीना शेख मॅडम, गणेश खाडे, अमोल सरोदे, व समस्त गावकरी उपस्थित होते.

# मराठा आरक्षण, तीर्थक्षेत्र निधीसाठी २४ रोजी उपोषण

## उपोषणा दरम्यान मेलो तरी हरकत नाही – गलांडे

केज/प्रतीनिधी

मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील हे २० जुलै २०२४ पासून आंतरवाली–सराटी जि. जालना या ठिकाणी आमरण उपोषणास बसणार आहेत.तरी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या विषयी महाराष्ट्र राज्य शासनाची भूमिका उदासिनतेची दिसून येत आहे.

तरी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या २० तारखे पासुन सुरू होणाऱ्या उपोषणाची दखल घेऊन राज्य सरकारने केलेल्या मराठा समाजाच्या सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात दि.२४/०७/२०२४ रोजी श्री संत नामदेव महाराज सभागृह येथे सकाळी १० वाजता रोहन गलांडे पाटील आमरण



उपोषणाला बसणार आहे मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहील असे निवेदनाद्वारे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. तसेच चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज मंदिरासाठी तीर्थक्षषासाठी ५० लाख रुपये मंजूर झालेल्या निधीचे वितरण करून श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्राचे काम करु असे लेखी आश्वासना नंतर उपोषणाला स्थगिती देण्यात आली परंतू उपोषणाला स्थगिती देऊन ऐक महीना उलटुन सुध्दा काम सुरू केले नसल्याने परत २४/०७/२०२४ रोजी अमरण उपोषन सुरू करण्यात येणार आहे जो पर्यंत कामाला प्रेत्येशात कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार आहे असे अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे .

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मुंडे यांनी लेखी आश्वासन देऊन श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला सुरुवात केली नाही तरी यांच्या वर कायदेशीर कारवाई करण्यात यावी कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण.

# राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा

## स्पर्धेत सहभागी व्हा – प्रा.प्रदिप रोडे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी देवगिरी प्रतिष्ठान बीड यांच्या वतीने साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय शालेय/आंतर महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० वाजता सदरील स्पर्धा तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड येथे आयोजित करण्यात आली असून या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीड संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा.प्रदीप रोडे यांनी केले आहे.

साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. सदरील राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा यावर्षी १५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. साहित्यसम्राट डॉ.अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याची कर्तृत्वाची चर्चा व्हावी आणि महापुरुषांच्या आदर्शाची परंपरा भावी पिढीसमोर यावी म्हणून देवगिरी प्रतिष्ठान बीड दरवर्षी राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करते. यावर्षी वरिष्ठ गटासाठी स्पर्धेचे विषय १)अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातुन आलेला मानवतावाद.२) फुले,शाहू,आंबेडकरी चळवळीचे वर्तमान. हे विषय असून कनिष्ठ गटासाठी १) जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मज भीमराव. २) संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांचे योगदान. हे विषय आहेत. या स्पर्धेत वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम सात हजार रुपये,स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र तर कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक रोख रक्कम पाच हजार रुपये, स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रोख रक्कम तीन हजार रुपये, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र तर तृतीय पारितोषिक दोन हजार रुपये, स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र असे आहे. उत्तेजनार्थ तीन स्पर्धकांना प्रत्येकी एक हजार रुपये रोख रक्कम, स्मृती चिन्ह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय बीड, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन बीड, तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे नाव नोंदणी करावी आणि युवक, युवती यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठान बीडचे संस्थापक अध्यक्ष तथा स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे.

# केज रोटरीचा मेगा वृक्षारोपण उपक्रम हरित केज करण्याचा निर्धार

केज । प्रतिनिधी

केज येथील रोटरी क्लबने शहरातील वेगवेगळ्या भागात झाडे लावण्याचा उपक्रम हाती घेतलाअसून 'केज शहर– हरित केज' करण्याचा मानस असल्या चे क्लबच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. रोटरी क्लब ऑफ केजचे विद्यमान अध्यक्ष रो. प्रकाश कामाजी,सचिव रो.अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन रो. हनुमंत भोसले व रो.बापू सिंगण यांनी पहिल्या टप्प्यात क्रांतीनगर सार्वजनिक स्मशानभूमी व केज शहर अंतर्गत भागात अंबेजोगाई–बीड महामार्गाच्या उत्तरेकडील (शासकीय विश्रामगृह– फलोत्पादन खाते) बाजूने वड,नांदूरकी,चिंच,लिंब व करंज यासारखी झाडे लावली जात आहेत. शुक्रवारी ६० झाडे लावण्यात आली आहेत. शहरा अंतर्गत झाडांना पाणी घालण्यासाठी केज नगरपंचायतने सहकार्य करावे अशी विनंती रोटरी च्या वतीने करण्यातआली आहे.या उपक्रमा अंतर्गत शहराच्या सर्व प्रमुख रस्त्यावर टप्प्याटप्प्याने वृक्षारोपण करणार असल्याचे अध्यक्ष प्रकाश कामाजी व अनंत तरकसबंद यांनी सांगितले केज शहरातील वृक्षप्रेमी युवक व नागरिकांनी यासाठी केज रोटरीला सहकार्य करावे.रोटरीने लावलेली झाडेजोपासण्या साठी नागरिकांनी उत्साह दाखवला असून ही सर्व झाडे शंभर टक्के जगवण्याचे उद्दिष्ट असल्याचे संस्थापक अध्यक्ष व प्रोजेक्ट चेअरमन हनुमंत भोसले यांनी म्हटले आहे.या महत्वपूर्ण उपक्रमासाठी अध्यक्ष प्रकाश कामाजी व सचिव अनंत तरकसबंद यांच्यासह प्रोजेक्ट चेअरमन बापू सिंगण, माजी अध्यक्ष प्रवीण देशपांडे,सूर्यकांत चवरे, दादा जमाले,संतोष पिलाजी व केज रोटरीच्या सर्व सदस्यांचे सहकार्य लाभत आहे.



# वसंतदादा पाटील महाविद्यालयात स्वागत समारंभ

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.१८)अकरावी वर्गात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा न. प. चे माजी सभापती संदिप जाधव होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या संस्थापिका कै. सौ. केशरबाई क्षीरसागर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते




करण्यात आले. प्रास्ताविकात प्रा. विठ्ठल शिंदे यांनी स्वागत समारंभ कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. शिक्षकांमधून प्रातिनिधिक स्वरूपात प्रा. कावेरी खुरणे यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांमधून रोहीत नागरगोजे, विमल उगलमुगले, अनिता वडलिक, श्रध्दा शेवाळे यांनी मनोगते व्यक्त केली. याप्रसंगी अकरावी वर्गात नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत बारावी वर्गातील विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प देऊन केले. उपस्थित प्राध्यापकांनी नवोदित विद्यार्थ्यांना स्वपरिचय करून दिला. उपप्राचार्य प्रा.नामदेव चांगण व प्रमुख अतिथी संदीप जाधव यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य आबासाहेब हांगे म्हणाले की, महाविद्यालयीन शिक्षणाचा कालखंड हा जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात विद्यार्थ्यांनी जीवनातील ध्येय व उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक असते. अकरावीच्या विद्यार्थ्यांनी नियमितपणे उपस्थित राहून अध्ययन केल्यास त्यांना अपेक्षित यश गाठणे नक्कीच शक्य होईल. सूत्रसंचालन जागृती गायकवाड, अंकिता भवर व अरिबा सय्यद यांनी केले. आभारप्रदर्शन कु. जिया सय्यद हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभागाचे डॉ.दिलीप गिऱ्हे, डॉ. कुशाबा साळुंके यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहाच्या विषयात उदासीनता नेमकी कोणाची?

## आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थित केला प्रश्न

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह होण्यासाठीचा प्रस्ताव आ.संदीप क्षीरसागर यांनी तीन वर्षांपूर्वीच शासनाकडे पाठवलेला आहे. याबाबत अजूनही पाठपुरावा सुरू आहे. आवश्यक त्या सर्व बाबींची उपलब्धता जवळपास पूर्ण झालेली असताना या विषयात उदासीनता नेमकी कोणाची? असा प्रश्न आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केला आहे. तसेच अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेला प्रश्न मार्गी लावण्यात यावा अशी मागणी केली आहे.

बीड विधानसभा मतदारसंघात अल्पसंख्यांक समाजाची लोकसंख्या अंदाजे ७० हजार आणि जिल्ह्याभरात अडीच लाखांपेक्षा जास्त आहे. सद्यस्थितीला जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या सन २०२२ मधील अहवालानुसार बीड शहरातील २५ शाळांमध्ये एकूण ३२४२ अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थीनी शिक्षण घेत होत्या. निश्चितच ही संख्या २ वर्षात वाढलेलीच असणार आहे. समाजातील मुलींच्या शिक्षणासंबंधीत अडचणी दूर व्हाव्यात व एकाच छताखाली विद्यार्थीनींच्या राहण्याची, जेवणाची, अभ्यासाची सुविधा उपलब्ध व्हावी. उच्च शिक्षण घेण्यासाठी अल्पसंख्यांक मुलींना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी बीड शहरात वसतीगृह असणे आवश्यक आहे. मतदारसंघासह जिल्ह्यातील अल्पसंख्यांक मुलींसाठी सर्व सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेले वसतीगृह व्हावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी तीन वर्षांपूर्वी केली होती. तसेच याबाबत नियमित पाठपुरावाही केला होता आणि सुरू आहे. परंतु या महत्त्वाच्या विषयात प्रशासनाकडून चालढकल करण्यात येत आहे. दोन वर्षांपूर्वीच नगरपालिकेकडून केलेल्या ठरावानुसार बीड शहरातील किल्ला मैदान येथील बलभीम महाविद्यालयाच्या पश्चिम बाजूची नगरपरिषदेच्या मालकीची २००० चौ.मी. जागा संमत झाली आहे. परंतु त्यांनतर नगरपरिषदेच्या मालकीची जागा महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्याबाबतची पुढील कार्यवाही रखडली आहे. त्यामुळे आ.क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनात दि.२७ जून २०२४ रोजी लक्षवेधी प्रश्न क्रमांक १५९० नुसार हा महत्त्वाचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. तसेच अनेकवेळा तारांकित व अतारांकीत प्रश्नाद्वारे या महत्त्वाच्या विषयावर प्रकाश टाकला आहे. सध्याही या विषयात जिल्हाधिकारी, आणि संबंधित प्रशासन यांच्याकडे आ.क्षीरसागरांचा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. बीडमध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुलींसाठी वसतीगृह होणे ही बाब समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक उन्नतीसाठी अनिवार्य झालेली आहे. त्यामुळे लवकरात लवकर प्रशासनाने यासंदर्भात पाऊले उचलून बीड शहरात अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थीनींसाठी सुसज्ज वसतिगृह उभे करावे. अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

# केज येथे गुरुपोर्णिमा उत्सव उत्साहात साजरा

केज । प्रतिनिधी

केज शहरातील वृंदावन धाम येथे ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्या वतीने गुरुपोर्णिमा उत्सव उत्साहपुर्ण वातावरणात संपन्न झाला.ठाकुर रामकृष्ण रामकृष्ण परमहंस परिवाराची स्थापना वै.प.पु. वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाने झाली.

ठाकुर रामकृष्ण परमहंस,शारदामाता, स्वामी विवेकानंद व वै.प.पु.वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करुन वंदन करण्यात आले.त्यानंतर आईंच्या पाद्यपुजनानंतर हनुमान चालीसा,हरीपाठ घेण्यात आला.यावेळी ठाकुर रामकृष्णपरिवाराचे महाराष्ट्रातुन सर्व साधक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.यावेळी हरीवचन. ओआरजी या वेबसाईटचे उदघाटन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आला. या वेबसाईटवर ठाकुर रामकृष्ण परिवाराचे सर्व उपक्रम दाखविण्यात येणार आहेत.तसेच सौ.रमाभाभी रिणवा यांनी स्वतः लिहिलेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथाचे अनावरण मान्यवरां च्या शुभहस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाचे सुत्र संचालन ठाकुर रामकृष्ण परिवाराचे समाधान महाराज शर्मा यांनी केले. महाप्रसादाने गुरुपोर्णिमा उत्सव कार्यक्रम संपन्न झाला.

# उपमुख्यमंत्री, कृषिमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त मोदी मित्रमंडळाच्या वतीने रक्तदान शिबिर

## ६४ रक्तदात्यांनी केले उत्स्फूर्त रक्तदान, जोपासला सामाजिक सेवाभाव




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना. अजितदादा पवार तसेच कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी मित्र मंडळाच्या वतीने भव्य असे रक्तदान शिबिर आयोजित केले होते. ना अजितदादा पवार यांचा ६४ वा वाढदिवस असल्यामुळे या रक्तदान शिबिरात ६४ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले.या रक्तदान शिबिराचे उद्घाटन प्रसंगी राजकिशोर मोदी यांच्यासह कापूस पणन महासंघाचे संचालक ऍड विष्णुपंत सोळंके, स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, मेडिसिन विभाग प्रमुख डॉ सिद्धेश्वर बिराजदार, डॉ राकेश जाधव, डॉ शेळके, रक्तपेढी विभाग प्रमुख डॉ विनय नाळपे ,डॉ दिपक कावळे, मनोज लखेरा, कचरूलाल सारडा, महादेव आदमाणे, तानाजी देशमुख ,सुनील वाघाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.**

याप्रसंगी स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी स्वा रा ती येथे सध्या मोठया प्रमाणावर रक्ताचा तुटवडा जाणवत असून अशा महत्वाच्या वेळी राजकिशोर मोदी यांनी रक्तदान शिबिर आयोजित करून रुग्णांना मोठा दिलासा दिल्याचे सांगितले. तसेच राजकिशोर मोदी व मित्रा मंडळाचे आभार व्यक्त करत धन्यवाद दिले. राजकिशोर मोदी यांनी देखील आपल्या कडून कधीही कसलीही अडचण येऊ देणार नसल्याचे सांगितले. आज दि २२ सोमवार रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री मा ना अजितदादा पवार आणि राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचा जन्मदिन संपूर्ण महाराष्ट्रात साजरा करण्यात आला. अनेक ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.

अंबाजोगाई येथील स्वा रा ती ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.येथे दररोज हजारो रुग्ण उपचारासाठी येतात. त्यामुळे रुग्णालयातील रुग्णांना रक्ताचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवतो. हीच गंभीर बाब लक्षात घेऊन अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने शासकीय रक्तपेढी येथे भव्य असे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. राजकिशोर मोदी हे एक सामाजिक सलोखा राखणारे व्यक्तिमत्त्व आहे. शहर व परिसरातील नागरिकांसाठी ते वेळोवेळी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात अग्रेसर असतांना दिसून येतात. त्यामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक तथा धार्मिक उपक्रमांचा सहभाग असतो. या अगोदर देखील त्यांनी असेच भव्य असे रक्तदान शिबिर आयोजित केले आहेत. कोव्हिडं काळात देखील असेच शिबीर घेऊन ११५५ रक्तदात्या कडून रक्तदान करवून घेतले होते. या रक्तदान शिबिरात रुपेश चव्हाण, गणेश मसणे, माणिक वडवणकर, अकबर पठाण,दत्ता सरवदे, अंकूश हेडे, संजय कोंबडे,रफिक गवळी, चंद्रकांत गायकवाड, संतोष शिनगारे, वजीर शेख, जुनेद बागवान, सुधाकर टेकाळे, गोविंद पोतंगले, दिनेश भराडीया, धम्मा सरवदे, शाकेर काझी,महेश कदम, विशाल पोटभरे, आकाश कऱ्हाड, शुभम लखेरा, जावेद गवळी, माहेबूब गवळी,उमेश पवार, शेख मुक्तार, खलील जाफरी,गोविंद जाधव, पंकज रापतवार, शाकेर पठाण , अनिसभाई, सय्येद ताहेर , राजेश कांबळे, पुरुषोत्तम तांबारें, अजीम जरगर, काशिनाथ चव्हाण,उज्जेन बनसोडे, रोशन लाड, अमित परदेशी, अमजद पठाण,सागर पान २ वर

# आष्टीमध्ये ३१ लाखांचा गुटखा जप्त




**जालना । प्रतिनिधी**

**परतूर तालुक्यातील आष्टी येथील पोलिसांनी ३१ लाखाचा गुटखा पकडून मोठी कारवाई केली ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगेवाड यांनी केली. रविवार दि.२१ रोजी रात्रीच्या वेळी आष्टी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना, त्यांना गुप्त खबर लागली की एक आयशर क्रमांक एम.एच.२० सी जी. ५८५४ घनसावंगी वरून नांदेडकडे गुटखा घेऊन जात आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाली**

त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह आष्टी पाथरी मोंढा टी पॉइंटवर सापळा रचून घनसावंगी कडून येणारा संशयीत आयशर ला थांबवून त्याचे नाव गाव विचारपूस केली असता, चालकाने कुणाल संतोषसिंग ठाकूर वय २१ वर्ष रा. राहुल नगर आबदिवाडी ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजीनगर सांगितले व सोबत असलेल्या क्लिनर ला नाव विचारले असता, कडूबा रंगनाथ आसवार वय वर्ष ३५,रा. मालेवाडी खुलताबाद, छत्रपती संभाजीनगर सांगितले. इंगेवाड यांनी आयशर मधील असलेल्या मालाबाबत चालकास विचारपूस केली असता,त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांनी सोबत असलेल्या अंमलदारास आयशरची तपासणी करण्यास सांगितले. सदर पान २ वर

# जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे येत्या ४५ दिवसात पूर्ण करण्याचे आदेश

## माजी मंत्री सुरेश धस यांच्या मागणीला यश

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी पाटोदा शिरूर या तीनही तालुक्यातील गेल्या अनेक दिवसांपासून शेतकऱ्यांच्या जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित होती सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या ऑनलाईन बैठकीमध्ये पुढील ४५ दिवसांच्या आत सर्व प्रलंबित प्रकरणे पूर्ण करण्याचे आदेश राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार यांनी दिले असल्याची माहिती माजी मंत्री सुरेश धस यांनी दिली.**

शेतकरी आपल्या जमिनीची मोजणी करण्यासाठी अर्ज करतात.शेतकऱ्यांची प्रकरणे भूमिअभिलेख कार्यालयाकडे तशीच अनेक दिवस पडून असतात.याच जमीन मोजणी संदर्भात अनेक शेतकऱ्यांनी अखेर सुरेश धस यांच्याकडे याबाबत तातडीने शासनाला आदेशित करून मोजणी बाबत समस्या मांडल्यानंतर सोमवारी




जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे माजी मंत्री सुरेश धस यांच्या उपस्थितीत राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेश कुमार संभाजीनगर विभागाचे उप संचालक, भूमिअभिलेख, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हाअधीक्षक, भूमिअभिलेख, आष्टी, पाटोदा, आणि शिरूर चे उपअधीक्षक भूमिअभिलेख ..यांची ऑनलाईन बैठक पार पडली.यामध्ये सुरेश धस यांनी आष्टी तालुक्यातील २२०, पाटोदा तालुक्यातील ९२, तर शिरूर कासार येथील १९९ प्रकरणे साधी मोजणी तातडीची मोजणी अति तातडीची मोजणी अति अति तातडीची मोजणी ची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे सांगत मोजणी वेळी सर्वेअर हजर न राहणे, मोजण्यांची पान २ वर

# अल्पवयीन मुलीस फूस लावून अपहरण मुलीसह आरोपी आठ दिवसांत जेरबंद

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन १५ वर्षीय मुलीला पुनस लावून अपहरण करून तरुणाने तिला पुण्यातील उरुळी कांचन येथे नेले. तिथे नर्सरीत मजूरी करून राहत होते. कुटुंब हताश झाले होते. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आष्टी पोलिसांनी उरुळी कांचन येथे जाऊन मुलीची सुटका करीत आरोपी ला आठ दिवसांत जेरबंद केले आहे.**

फुस लावून पळवून नेण्याच्या घटना घडत आहेत. पालकांनो आपली मुलगा मुलगी काय करतात याकडे लक्ष द्यावे मोबाईल चा अति वापर करून देऊ नये असे आवाहन पोलिस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे यांनी केले आहे. अल्पवयीन मुलीस फूस लावून याबाबत पोलिसांकडून मिळालेली सविस्तर माहिती अशी की आती तालुक्यातील एका गावातील १५ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या गावातून तरुणाने कुस



लागून पळवून नेले मुलीच्या वडीलांच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस स्टेशन मध्ये १२ जुलै रोजी गुन्हा रजिस्टर नंबर २८७/२०२४ कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. अपहरण झालेल्या मुलीच्या शोधार्थ सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे, यांच्या मार्गदर्शनाखाली पी. ह. ११९५ अशोक शिंदे, पान २ वर



## पोलिस, महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे खुलेआम वाळू उपसा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील गेल्या अनेक दिवसांपासून महसुल व पोलिस याच्या दुर्लक्ष पणामुळे दिवसरात्र खुलेआम वाळु उपसा होत असल्याने यातुन लाखो रूपयांची वाटाघाटी महिन्याकाठी होत आहे. शास नाच्या लाखो रूपये महसुल ला हाडताळ फासला जात आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून यांची दखल घेऊन त्वरीत अवैध वाळु उपसा बंद करावा अशी मागणी केली जात आहे.**

आष्टी तालुक्यातील आष्टी,अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील अनेक गावात दिवसरात्र अवैध वाळुचा उपसा होऊन त्याची खुलेआम वाहतूक केली जात आहे. पान २ वर

# पदोन्नती प्रक्रिया राबवून विषय शिक्षकांच्या जागा भरण्याचे आदेश

## जयदत्त क्षीरसागर यांच्या मागणीची दखल

**बीड। प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद अंतर्गत पद भरतीपुर्वी कार्यरत असलेल्या शिक्षकांमधुन विषय शिक्षकांच्या रिक्त पदावर तातडीने नियुक्त्या करण्याचे आदेश शिक्षण संचालक प्राथमिक विभाग यांनी दिले असुन या जागा भरण्यात याव्यात यासाठी प्रहार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून रिक्त पदे भरण्याची मागणी केली होती. माजी मंत्री क्षीरसागर यांनी शिक्षण संचालक यांना तातडीने पाठपुरावा करून बीड जिल्हा परिषद अंतर्गत रिक्त पदावर नियुक्त्या कराव्यात अशी मागणी केली होती.त्यानुसार आता या जागा भरण्याची प्रक्रिया होणार आहे.**



बीड जिल्ह्यात जळवपास ४५० विषय शिक्षक ज्यात गणित,विज्ञानची रिक्त पदे आहेत.त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. सन २०१४ पासून प्राथमिक पदवीधर पदोन्नती प्रक्रिया राबवण्यात आलेली नाही. परिणामी ग्रामीण भागात उच्च प्राथमिक शिक्षणाचे विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.ही बाब संघटनेचे जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी आणि पदाधिकारी यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांची भेट घेवून ही बाब निदर्शनास आणून दिली. शिक्षण संचालक शरद पान २ वर

# स्वत:ची गुणवत्ता विकसित करा–सुशिल कुलकर्णी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**समाजातील युवक युवती यांनी असलेल्या बुद्धिमत्तेचा योग्य वापर करून स्वत: मधील गुणवत्ता विकसित करावी असे मत अनालाईजर न्युजचे संपादक सुशिल कुलकर्णी यांनी व्यक्त केले. पेशवा प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत कौतुक सोहळ्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चंद्रकांत मुळे होते तर व्यासपीठावर डॉ.हेमंत वैद्य,संतोष कुलकर्णी,डॉ.महेश अकोलकर आदी उपस्थित होते.**

पेशवा प्रतिष्ठानने गुणवंतांचा गौरव केला ही अत्यंत महत्वपुर्ण बाब आहे. ब्राम्हण समाजाने स्वतःच्या प्रगतीची बलस्थाने शोधली पाहिजेत संघर्षातून इतिहास निर्माण करणारा आमचा पॅटर्न असून अलिकडच्या काळात आपल्या संस्कृतीचा विसर आपणास पडत आहे कोणतेही क्षेत्र निवडताना त्या क्षेत्राला भविष्य काय आहे हे तपासणी करणे गरजेचे आहे. संबंध, संपर्क व संदर्भ या त्रिसुत्रीचा अवलंब जीवनात झाल्यास जीवनात आनंद निर्माण होईल असेही त्यांनी सांगितले. डॉ.वैद्य म्हणाले की गुणवत्ता मिळविण्यासाठी कठोर परीश्रम आवश्यक असतात ते विद्यार्थ्यांनी केले पाहीजेत पान २ वर




**बीड: नगर रोडवरील बीड पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोरच विजेच्या तारा आडव्या गेलेल्या सोमवारी या ठिकाणी येणाऱ्या प्रत्येकाने अनुभवल्या. गेटवर आल्या आल्या गाडीला करकचून ब्रेक मारला जात होता. मात्र नंतर कळले की या तारा नवीन लाईन साठी टाकलेल्या आहेत .हे सांगायला महावितरणचा एकही कर्मचारी या ठिकाणी दिसला नाही. त्यामुळे पंचायत समिती कार्यालयात येणारा प्रत्येक जण या तारा पाहून आतून हादरून जात होता. त्यात विजेचा प्रवाह नसला तरी येणाऱ्या प्रत्येक माणसाला या तारा तुटून पडल्या की काय असा भास होत होता.**

# महसुल कर्मचाऱ्यांच्या संपामुळे सर्वसामान्य त्रस्त

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**महसूल कर्मचारी संघटना बेमुदत संप पुकारलेला आहे बेमुदत संपाचा ८ वा दिवस आहे. शासन मागण्या कडे लक्ष देत नसल्याने हा संप तिंव्र करण्याचा इशारा देण्यात आला असून सर्वसामान्याची तहसील कार्यालयातील कामे मात्र ठप्प झाली आहेत.**

राज्यातील महसुल कर्मचारी संघटनेने १५जुलै पासुन बेमुदत संप विवीध मागण्या साठी पुकारल्याने सर्व कामकाज तहसील कार्यालयाचे ठप्प झाले आहे रोज तहसील कार्यालयात सर्वसामान्य चकरा मारून बेजार



आहे त्यांला रिकाम्या खुर्च्या बघून परतावे लागत आहे व सर्व सामान्य त्रस्त झाला आहे. महसुल कर्मचा-यानी आठ दिवसा पासून संप शांततेच्या मार्गाने सुरू शासन लक्ष देत नसल्याने हे आंदोलन तिंव्रकरण्याचा ईशारा महसूल कर्मचारी संघटना तालुका अध्यक्ष प्रकाश गोपड व कर्मचारी प्रदीप बनसोडे , माधव धुमक, संजय धबडगे, शिवाजी घुले ,गुरुप्रसाद तारळकर, श्रीमती गादेवाड, ओहळ व मंडळ अधिकारी,लहू केदार, सोपान वाघमारे ,कोतवाल रईस,पवार , तिबोले, चोपडे ,कुटे इतर कर्मचारी यांनी दिला

# डास प्रतिबंधक औषधाची फवारणी सुरू

**परळी । प्रतिनिधी**

**परळी शहरामध्ये पावसाळ्याच्या दिवसांत डेंग्यू तापावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून नगर परिषद परळीच्या वतीने शहरातील विविध भागात डास प्रतिबंधक औषधाची फवारणी करण्यात येत आहे.**

परळी वैजनाथ नगर परिषदच्या वतीने साथरोग प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी डास निर्मुलन मोहीम अंतर्गत डासांचा प्रादुर्भाव होऊ नाही म्हणून उपाय योजना नगर परिषद मार्फत करण्यात येत आहेत. नगर परिषदच्या वतीने खबरदारी म्हणून उपाय योजना स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत आहेत शहराला स्वच्छ ठेवणे व डेंगू आजारापासून



नागरिकांनी कोणते उपाय करावे काय, काळजी घ्यावी या करिता घरोघरी जाऊन उदा,पाणी टाकी , किंवा पाणी साठवण करण्याच्या सर्व प्रकारच्या जागी अबेटिग टाकण्यात येत, आहे जेणेकरून त्या पाण्याच्या पृष्ठभागावर डेंगू सारखे मच्छर, होऊ नाही म्हणून याची माहिती सुद्धा देण्यात येत आहे त्याच प्रमाणे पूर्ण परळी शहरात प्रत्येक घरात जाऊन फवारणी करण्यात येत आहे शहराच्या मुख्य रस्त्यावर फॉगिंग मशीनद्वारे धूर करून फवारणी करण्यात येत आहे. जेणेकरून बाहेर रस्त्यावर सुद्धा स्वच्छ वातावरण राहावे मछर होऊ नाहीत यापुढे जनजागृती म्हणून शहरात प्रचार करण्यात येत आहे अश्या अनेक नागरिकांच्या आरोग्याचा विषय असल्या कारणाने ही मोहीम नगर परिषद घेत असून या मोहिमे साठी विशेष पथक म्हणून कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून संपूर्ण शहरात ही मोहिम जनजागृती घराघरात पोहचवी असा नगर परिषदचा हेतू असून नगर परिषद मार्फत तर सर्व उपाय योजना राबविण्यात येत आहेत परंतु नागरिकांना ही आपली कुटूंबाची काळजी म्हणून नगर परिषद द्वारे सांगण्यात अलेल्या आव्हानाला प्रतिसाद द्यावा जेणेकरून आपले परळी शहर अश्या आजारापासून दूर राहील अशी दक्षता घ्यावी असे आवाहन नगर परिषदने केले आहे त्याच बरोबर नागरिकांनी आपल्या परीसरात स्वच्छता राखा कचरा नगर परिषदच्या घटा गाडीतच टाका ,पाणी स्वच्छ ठिकाणी साठा करावा, सर्व कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे असे आव्हान नगर परिषदचे प्रशासक तथा मुख्यधिकारी त्रिबक कांबळे, उपमुख्यधिकारी संतोष रोडे, स्वछत विभागचे शंकर साळवे, विकास बनसोडे आदीनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# प्रियकराने महिलेला दोन मुलांसह नदीत फेकले

## पुण्यातील मावळमधील मन सुन्न करणारी घटना

पुणे : पुण्याच्या मावळ तालुक्यात मन हेलावून टाकणारी घटना समोर आली आहे. विवाहबाह्य संबंधातून गर्भवती राहिलेल्या महिलेसह तिच्या दोन मुलांना तिच्याच प्रियकराने संपवले आहे. याप्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी प्रियकर आणि त्याच्या मित्राला अटक केली आहे. प्रियकर गजेंद्र दगडखैर आणि त्याचा मित्र रविकांत गायकवाड अशी आरोपींची नावे आहेत.




विवाहबाह्य संबंधातून गर्भवती राहिलेल्या महिलेचा गर्भपात करण्यासाठी आरोपी गजेंद्र दगडखैर याने तिला रुग्णालयात नेलं होतं. मात्र रुग्णालयात तिचा मृत्यू झाला. त्यानंतर तिचा प्रियकर आणि त्याचा मित्र यांनी या महिलेचा मृतदेह नदीत फेकून दिला. ही सर्व घटना तिच्या मुलांनी डोळ्यासमोर पाहिली आणि आरडाओरड सुरू केला. त्यानंतर आरोपी प्रियकर आणि त्याच्या मित्राने या दोन्ही मुलांना देखील त्याच वाहत्या पाण्याच्या प्रवाहात फेकून दिले.

६ जुलैला गर्भवती महिला तिच्या दोन मुलांना घेऊन तिचा प्रियकर गजेंद्र दगडखैर यांच्याकडे कळंबोली येथे गेली होती. तेथील एका खासगी रुग्णालयात प्रेयसीचा गर्भपात केला. मात्र डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. आरोपी गजेंद्र आणि त्याच्या मित्रांने मृतदेह मावळ येथे आणला आणि इंद्रायणी नदीच्या वाहत्या पाण्यात फेकून दिला. सर्व घटना तिचे दोन्ही मुलं पाहत होते. घटनेनंतर दोन लहान मुलांनी हंबरडा फोडला. त्यानंतर आरोपींनी मुलांनाही पाण्याच्या प्रवाहात फेकून दिले. मृत महिला घरी न परतल्यामुळे ती हरवली असल्याची फिर्याद तळेगाव एमआयडीसी पोलिसांत तिच्या कुटुंबीयांनी दिली होती. या संदर्भात तपास करत असताना पोलिसांना महिला प्रियकर गजेंद्र आणि त्याच्या मित्रासोबत फोनवर वारंवार संभाषण करत होती हे समोर आले. त्यानंतर तळेगाव एमआयडीसी पोलिसांनी या दोन्ही आरोपींना ताब्यात घेतलं आणि चौकशी केली. त्यावेळी आरोपींनी गुन्हाची कबुली दिली. तळेगाव एमआयडीसी पोलीस याबाबत अधिक तपास करत आहेत.

# मनोरमा खेडकर यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

पुणे : मुळशी तालुक्यातील धडवली येथे शेतकऱ्यांना मारहाण केल्या प्रकरणी अटकेत असलेल्या मनोरमा खेडकर यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनविण्यात आली. त्यांचा जामीन नामंजूर करण्यात आला आहे.



पौड पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेने महाडमधून मनोरमा खेडकरला गुरूवारी (दि. १८) सकाळी अटक केली. त्यानंतर पौड येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सुधीर. जी. बरडे यांच्या न्यायालयापुढे हजर करण्यात आल्यानंतर मनोरमा खेडकरला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनविण्यात आली होती. ती कोठडी २० जुलै रोजी संपल्यानंतर पुन्हा खेडकरला न्यायालयात हजर करण्यात आले असता तिला २२ जुलैपर्यत दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनविण्यात आली होती. सोमवारी (दि.२२) मनोरमा खेडकरला पौड येथे न्यायदंडाधिकारी सुधीर. जी. बरडे यांच्या न्यायालयापुढे हजर करण्यात आल्यानंतर त्यांचा जामीन नामंजूर करण्यात आला. तसेच १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनविण्यात आली. यावेळी सरकारी वकीलांनी आणखी काही आरोपी केले असून तपास सुरू असल्याचे न्यायालयाला सांगितले. तर फायरिंग झाले नाही, तसेच कोणाला जखमही झालेली नाही, असे मनोरमा खेडकरच्या वकीलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न केला.

मुळशीतील घडवली गावात शेतकऱ्यांना मनोरमा खेडकर यांनी पिस्तुलाचा धाक दाखवून धमकाविल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. याप्रकरणी शेतकरी पंढरीनाथ कोंडीबा पासलकर (वय ६५, रा. केडगाव, आंबेगाव पुनर्वसन, ता. दौंड) यांनी पौड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. याप्रकरणी मनोरमा खेडकर यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला. मनोरमा दिलीप खेडकर, दिलीप खेडकर, अंबादास खेडकर यांच्यासह सात जणांविरुद्ध पौड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. खेडकर यांच्यासोबत शेतकऱ्यांना धमकाविण्यासाठी आलेल्या अंगरक्षकांविरुद्ध (बाऊन्सर) गुन्हा दाखल आहे. आरोपींमध्ये महिला अंगरक्षकांचाही समावेश आहे.

# भाजपसमोर उद्धव ठाकरे हेच मोठे आव्हान-सुषमा अंधारे



पुणे : महाराष्ट्रात उद्धव ठाकरे हेच सर्वांत मोठे आव्हान आहे. अमित शहा यांनी पुण्यात येऊन जी मुक्ताफळे उधळली आहेत, त्यावरून हे स्पष्ट झाले आहे. त्यांना महाराष्ट्रात आल्यानंतर आपले भाषण चुरचुरीत करण्यासाठी उद्धव ठाकरे यांचे नाव घ्यावे लागत आहे. त्याशिवाय त्यांना भाषणाची सुरूवात करता येत नाही. भाषण संपवता ही येत नाही. त्यांनी भाषणावेळी वापरलेली भाषा दुर्दैवी असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी सोमवारी (दि.२२) पत्रकार परिषदेत केला.

पुण्यामध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत सुषमा अंधारे बोलत होत्या. अंधारे म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा हे दोघेही एकसारखंच अघळपघळ बोलतात. देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील अधिवेशनात ज्याप्रकारे भूमिका मांडली. ते पाहता फडणवीस हेच फेक नरेटिव्हचे सर्वात मोठे केंद्र असल्यासारखे वाटतात. भाजप पक्ष कायमच हिंसा करतो. इथला हिंदू हिंसक नाही. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक म्हणजे सकल हिंदू अशी भाजपची समजूत आहे. राज्यातील मराठा आणि ओबीसी समाजाला भाजप का खेळवत आहे? राज्यात जातीय विषपेरणी करू नका,आरक्षणाचा तोडगा काढा. दिल्लीत संसदेचे अधिवेशन सुरु आहे. भाजपमध्ये हिंमत असेल तर त्यांनी लोकसभेत मराठा आरक्षणाचा प्रस्ताव मांडावा. तुमची नियत मराठा समाजाला कळू द्या, असे सुषमा अंधारे यांनी यावेळी म्हटले. अमित शहा यांनी भाजपच्या अधिवेशनात उद्धव ठाकरे यांचा उल्लेख औरंगजेब फॅन्स क्लबचे अध्यक्ष असा केला होता. त्याला उत्तर देताना सुषमा अंधारे यांनी म्हटले की, आम्हाला अमित शहा यांच्यावर बोलायचे नाही. तडीपार लोकांनी महाराष्ट्रात येऊन आम्हाला शहाणपणा सांगण्याची गरज नाही. आम्ही कोण आहोत, आम्ही काय आहोत? याचं सर्टिफिकेट गुजरातच्या तडीपार माणसाकडून घेण्याची गरज वाटत नाही. ज्यांच्या हातावर जस्टिस लोया यांच्या खुनाचे डाग आहेत, त्यांनी आम्हाला सर्टिफिकेट देऊ नये, अशी टीका अंधारे यांनी यावेळी केली. सुषमा अंधारे यांनी खोचक शैलीत अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या दोघांची जन्म तारीख १ एप्रिल असावी, त्यांच्या वागण्यातून ते दिसते. फडणवीस गृहमंत्री आहे की ठोक मंत्री आहेत. कुंपणच शेत खात असेल तर कसे होणार, असा सवालही सुषमा अंधारे यांनी यावेळी उपस्थित केला.

# पुण्यातील पोर्शे अपघातप्रकरणात आमदार सुनील टिंगरेंची तीन ते चार तास चौकशी

## अजित पवारांचा गौप्यस्फोट





पुणे : पुण्याच्या कल्याणीनगरमधील पोर्शे कार अपघाताच्या दिवशी वडगाव शेरीचे आमदार सुनील टिंगरे यांनी मध्यरात्री पोलीस ठाण्यात पोहोचले होते. यानंतर सुनील टिंगरेंकडे देखील संशयानं पाहिलं जात आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. कल्याणीनगर पोर्शे अपघात प्रकरणी सुनील टिंगरेंची तीन ते चार तास चौकशी झाल्याची माहिती अजित पवारांनी दिली आहे.

अजित पवार म्हणाले, आपल्या काही लोकप्रतिनिधींना बदनाम करण्याचा प्रयत्न झाला आहे. या बदनामीमुळे शेवटी सुनीलची तीन ते चार चौकशी झाली. त्या चौकशीत जे काही घडले ते सुनीलने स्पष्ट सांगितले. यामध्ये सुनीलचा दुरान्वये देखील संबंध नव्हता. परंतप कारण नसताना काही जणांनी त्याचे नाव यामध्ये गोवण्याचा प्रयत्न केला. एखाद्या आमदाराच्या मतदारसंघात काही प्रकार घडला असेल तर तिथल्या आमदाराला रात्री जाणे भाग आहे. आधार देणे हे त्याचे कर्तव्य आहे. घटनास्थळी काय घडले आमदाराला पोलिस स्थानकात गेल्यावरच कळणार अगोदर त्याला काय स्वप्न पडणार का? महिला, पुरुष, युवक, युवतींनी व्यवस्थित राहा, कुठेही पक्षाची बदनामी होणार नाही अशा प्रकारचे कृत्य तुमच्या हातून होऊ देऊ नका. मधल्या काही घटना पुण्याला बदनाम करणाऱ्या झाल्या. त्या प्रकरणात कडक ॲक्शन घेण्यास आपण मागे पुढे पाहिले नाही. जे जे त्या प्रकरणात होते त्यांच्या चौकशा करून त्यांच्यावर कारवाई केली. परंतु अशा काही घटना घडल्या तर यामध्ये काही चांगले देखील भरडले जातात, असे देखील अजित पवार म्हणाले.

# पुण्यातील या भागात गुरुवारी येणार नाही पाणी

पुणे : स्वारगेट मेट्रो स्थानकासमोर मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत असल्याने महापालिका प्रशासनाकडून पाणी गळती थांबविण्यासाठी जलवाहिनी दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. त्यासाठी शहराच्या मध्यवर्ती भागातील काही पेठांसह पूर्व भागामध्ये गुरुवारी (ता.२५) रोजी पाणी पुरवठा बंद राहणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी उशिरा व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याची माहिती महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने दिली.

पर्वती जलकेंद्रामध्ये येत असलेल्या एमएलआर टाकीवरून भवानी पेठेकडे जाणाऱ्या ६०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीवर स्वारगेट मेट्रो स्थानकाच्यासमोर मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती सुरू आहे. ही गळती थांबविण्यासाठी संबंधित भागातील पाणी पुरवठा गुरुवारी बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाच्यावतीने देण्यात आली.

शंकरशेठ रस्ता परिसर, गुरुवार पेठ, बुधवार पेठ, कासेवाडी, क्वार्टरगेट, महात्मा फुले पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहियानगर, सोमवार पेठ, अरुण कुमार वैद्य स्टेडीयम, घोरपडे पेठ, लक्ष्मीनारायण टॉकीजमागील काही भाग, सारसबाग परिसर, खडकमाळ आळी, शिवाजी रोड परिसर, मुकुंदनगर, महर्षीनगरचा काही भाग, टीएमव्ही कॉलनी, मीनाताई ठाकरे औद्योगिक वसाहत, अप्सरा टॉकीज परिसर, मीरा आनंद परिसर, श्रेयस सोसायटी. या ठिकाणी पाणी येणार नसल्याचे सांगण्यात आले आहे.

# फुगेवाडी ग्रामस्थांची पायपीट थांबणार; भुयारी मार्गाच्या कामास दोन महिन्यांत होणार सुरुवात



पुणे : फुगेवाडी गावकऱ्यांना गेल्या अनेक वर्षांपासून हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफनभूमीकडे ये-जा करण्यासाठी रस्त्याच्या प्रश्नासाठी झगडावे लागत होते. महापालिकेकडून या कामासाठी बजेट देण्यात आलेले असताना केवळ रेल्वे प्रशासनाकडून अंतिम मंजुरी मिळण्यासाठी दिरंगाई होत होती. आता मात्र या कामास गती मिळणार आहे. रेल्वे विभागाकडून कामास मंजुरी मिळाल्याने येत्या दोन महिन्यांत येथील कामात सुरुवात होणार असल्याचे महापालिका स्थापत्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

पूर्वीपासून फुगेवाडीतील नागरिक हिंदू स्मशानभूमी व मुस्लिम दफन भूमीकडे जाण्यासाठी रेल्वे रुळाचा वापर करत होते. मात्र, रेल्वे प्रशासनाने मंजुरी देण्यास व काही वर्षांपासून येथून ये-जा करण्यासाठी मार्ग बंद केला होता. परिणामी पन्नास पावलावर असलेल्या स्मशान भूमी व दफन भूमीकडे जाण्यासाठी फुगेवाडीकरांना दापोडीमार्गे वळसा घालून जावे लागत होते. रेल्वे प्रशासनाकडून या सर्व भागाला लोखंडी खांब व पत्रे लावून रुळावरून होणारी ये-जा बंद केली आहे. सद्यस्थितीत गावकर्यांना स्मशानभूमीकडे जाण्यासाठी साधारण एक ते दीड किलोमीटर वळसा घालून जावे लागत आहे. यासाठी रेल्वे प्रशासन, महापालिका, स्थानिक आमदार, खासदार यांच्याकडे येथील काम लवकर सुरू करावे यासाठी पाठपुरावा सुरू होता. दापोडी येथील सिद्धार्थनगरच्या धरतीवर भुयारी मार्गाची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. गेल्या दीड वर्षापासून फुगेवाडी येथील नागरिकांना ये-जा करण्यासाठी कसरत करावी लागत होती. त्यासाठी अनेकदा निवेदन दिले होते. त्यानंतर महापालिका प्रशासनाकडून फुगेवाडीकरांचा प्रश्न मार्गी लागला आहे. प्रशासनाने लवकरात लवकर काम सुरू करावे.

# उद्धव ठाकरे मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी-चंद्रशेखर बावनकुळे

पुणे : भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी आहेत, असा हल्लाबोल बावनकुळे यांनी केला. पुण्यातील भाजप महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनात ते बोलत होते.

चंद्रशेखर बानवकुळे यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना चंद्रकांत पाटील आणि त्यांच्या टीमने मराठा आरक्षण देण्यासाठी उत्कृष्ट काम केले. देवेंद्र फडणवीस यांनी अनेक रात्री जागून मराठा समाजाला टीकणारं आरक्षण देण्यासाठी काम केलं. देवेंद्र फडणवीस यांनी २० रात्री जागून मराठा आरक्षणासाठी कायदा तयार केला. आम्ही देवेंद्रजींना सांगायचो पहाटे ४ पर्यंत जागता, तब्येतीची जरा काळजी घ्या. पण रात्रंदिवस जागून त्यांनी काम केले. मराठा आरक्षणाचा कायदा विधीमंडळात मंजूर झाला, हायकोर्टात मंजूर झाला. मराठा समाजाला आरक्षण दिलं तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते आणि सुप्रीम कोर्टात केस सुरु असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.



मात्र उद्धव ठाकरेंचं सरकार असताना मराठा आरक्षणाची बाजू सुप्रीम कोर्टात नीट मांडली गेली नाही, असा आरोप चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने चार चांगले वकील नेमले असते तर मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न त्याच दिवशी निकाली लागला असता. त्यामुळे मराठा समाजाचे खरे मारेकरी उद्धव ठाकरे आहेत. आंदोलनाच्या माध्यमातून देवेंद्र फडणवीसांना व्हिलन करण्याचा प्रयत्न होत आहे. मराठा समाजाच्या आरक्षणाला भाजपचा पूर्ण पाठिंबा आहे, असंही चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले.

# रविकांत तुपकारांचा स्वाभिमानी संघटनेशी संबंध नाही-जालिंदर पाटील

पुणे : स्वाभिमानी शेतकरी संघटनेची पुण्यात स्वतंत्र बैठक घेताना रविकांत तुपकर यांनी पक्ष प्रमुख राजू शेट्टी यांना विश्वासात घेतले नाही. मागील तीन ते चार वर्षे स्वतःचा टीआरपी वाढवण्यासाठी ते काहीबाही आरोप करत आहेत. ही संघटना माझीच असल्यासारखे त्यांचे वागणे असून, त्यांनी पक्षशिस्तीचा भंग केला आहे. त्यामुळे यापुढे 'स्वाभिमानी शेतकरी संघटने' शी रवींद्र तुपकरांचा संबंध नाही, अशी माहिती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. प्रा. जालिंदर पाटील यांनी सोमवारी (दि.२२) पत्रकार परिषदेत दिली.



या पत्रकार परिषदेला संघटनेचे पदाधिकारी सतीश काकडे, घनशाम चौधरी, विठ्ठल मोरे, अमरसिंह कदम, अनिल पवार आदि पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना पाटील म्हणाले, की तुपकर यांनी २६ सप्टेंबर २०१९ रोजी पक्षाचा राजीनामा दिलेला आहे. ही संघटना सर्वसामान्य कार्यकर्त्यांची आहे आणि पक्ष नोंदणीकृत आहे. कष्टाने पक्ष उभारण्यात आला असून, राजू शेट्टी यांनी त्यांचे काय नुकसान केले आहे, हे सांगावे. पक्षाच्या कोणत्याही आंदोलनात ते आले नाहीत. शेतकऱ्यांसाठी ते लढतात, ही चांगली गोष्ट आहे. राज्यात आता दहा शेतकरी संघटना आहेत. त्यात तुपकर यांच्या आणखी एका संघटनेची भर पडली आहे. आमच्या खांद्याला खांदा लावून ते लढले आहेत. त्यामुळे त्यांची हकालपट्टी केली, असे आम्ही म्हणणार नाही. स्वतःचा वेगळा सुभा करताना आमचे मंगळसूत्र त्यांचा गळयात कशासाठी, हा आमचा सवाल आहे. तुपकर यांनी आगामी राजकीय वाटचालीच्या दृष्टीने एक बैठक घेतली. पण त्याबाबत पक्षाला कल्पना नाही. त्यांना युवा नेता म्हणून अनेक पदे दिली गेली. पक्षाचा पहिला लाल दिवा त्यांना दिला गेला. पण सन २०१९ च्या निवडणुकीत ते कोणतेही कारण न देता पक्ष सोडून गेले. एक महिन्याने पुन्हा पक्षात आले. पण ते पक्ष नेतृत्वावर सतत टीका करत आहेत. पक्षाच्या शिस्तभंग समितीसमोर त्यांना बोलावले. पण ते आले नाहीत. सदाभाऊ खोत हे मंत्री असताना त्यांना पक्षाच्या शिस्तभंग समितीसमोर बोलवण्यात आले. या समितीत तुपकरदेखील होते आणि सदाभाऊ खोत यांनी कशी उत्तरे दिली, याची त्यांना कल्पना आहे. राज्य कार्यकारणी बैठकीस दोन वेळा बोलावून ते आले नाहीत. आमचा परिवार असून अंतर्गत धुसफूस पक्षात मिटवली पाहिजे. मीडियासमोर बोलून काही साध्य होणार नाही, याची जाणीव त्यांना नाही. त्यामुळे शेतकरी संघटना आणि रवींद्र तुपकर यांचा आजपासून संबंध संपलेला आहे, असे ते म्हणाले.

# दारुसाठी कोयत्याने धाक दाखवून एकाला लुटले

पुणे : दारू पिण्यासाठी पैसे न दिल्यामुळे चोरट्यांनी तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून १४ हजार रुपयांची रोकड लुटून नेली. तसेच, गुलटेकडी भागातील मीनाताई ठाकरे वसाहतीमध्ये दहशत निर्माण केल्याचा प्रकार घडला. या प्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



याबाबत एका तरुणाने (वय २३, रा. धनकवडी) स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून अमन शाकीर शेख (वय १९, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध रविवारी (ता. २१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी तरुण हा मीनाताई ठाकरे वसाहतीमधील एकदिल मित्रमंडळाजवळ आला होता. त्यावेळी आरोपींनी त्याला अडवून दारू पिण्यासाठी पैसे मागितले. तरुणाने पैसे देण्यास नकार दिला. त्यावर आरोपींनी तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून खिशातील १४ हजारांची रोकड काढून घेतली. या घटनेचे मोबाइलमध्ये चित्रीकरण करताना आरोपींनी कोयत्याने तरुणाचा मोबाईल फोडला. त्याने आरडाओरडा केल्यानंतर नागरिक त्याच्या मदतीला धावून आले. त्यावेळी आरोपींनी नागरिकांवर कोयते उगारून परिसरात दहशत निर्माण केली.